मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ४३ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● सप्टेंबर २०००

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

वाचा आणि विचार करा

## गुन्हेगार आणि राजकारण्यांची अभद्र युती - राष्ट्रपती के. आर्. नारायणन

*भ्रष्टाचार हा शिष्टाचार झाला आहे. राजकारणी लोक आणि अधिकारीवर्गाचे यामधे संगनमत असते, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा राजकारणांत मोठ्या प्रमाणांत प्रवेश इत्यादि अपप्रवृत्तींबाबत वारंवार बोलले जाते.*

*पण स्वातंत्र्यादिनाच्या पूर्वसंध्येला जनतेला संदेश देताना राष्ट्रपती के. आर. नारायणन यांनी 'गुन्हेगार आणि राजकारण्यांची अभद्र युती' हा मुद्दा प्रकर्षाने मांडला. यातून या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात येईल.*

*राष्ट्रपतींचे भाषण आणि याबाबत वृत्तपत्रात व्यक्त झालेली मते येथे दिली आहेत. वाचकांना आवाहन आहे की त्यांनी याबाबतचे आपले विचार पुढील अंकात प्रसिध्दीसाठी पाठवावे. - संपादक*

१) 'गुन्हेगार आणि राजकीय नेते वा समाजातील महत्त्वाच्या व्यक्ती यांची अभद्र युतीच आज दिसते आहे. गुन्हेगारीकरणाला विरोध करण्याची भूमिका खरेतर सर्व व्यासपीठांवरून घेतली जायला हवी, पण तशी भाषादेखील कुणी करीत नाही.' अशा शब्दांत, शतकारंभीच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त भारतीयांना संदेश देताना राष्ट्रपती के. आर. नारायणन् यांनी आत्मपरीक्षणाचाही सूर लावला.

हिंसाचाराला गुन्हेगारीची साथ नेहमीच असते. आजघडीला गुन्हेगार आणि राजकीय नेते तसेच समाजातील महत्त्वाच्या व्यक्ती यांचे संबंध इतके वाढले आहेत की जणू त्यांची अभद्र युतीच कार्यरत झालेली दिसत आहे. या गुन्हेगारीला प्रतिष्ठा देण्याचे काम प्रसारमाध्यमे करीत आहेत! गुन्हेगारांभोवती कीर्तीचे वलय निर्माण करणारा, त्यांना नायक ठरविणारा संदेश प्रसारमाध्यमांमुळे मिळत असतो.

या वाढत्या गुन्हेगारीचा बंदोबस्त करण्याचे काम सभ्य समाज आणि कायद्याची सत्ता या दोघांचेही आहे. या दोघांनीही आपले वर्चस्व टिकवण्यासाठी गुन्हेगारीविरुध्द लढले पाहिजे. खरेतर, प्रत्येक सामाजिक आणि राजकीय व्यासपीठावरून गुन्हेगारीचा निषेध होण्याची, गुन्हेगारीविरोधात भूमिका घेतली जाण्याची गरज आहे; पण तशी इच्छाशक्तीदेखील दिसून येत नाही. उलट, गुन्हेगारांनाच आदर्श मानले जाते की काय अशी स्थिती आहे, अशी स्पष्ट खंत राष्ट्रपतींनी बोलून दाखविली.

- महाराष्ट्र टाईम्स १५.८.२०००

### २) सदसद्विवेकबुध्दीला रजा

राष्ट्रपती स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला देशाला संबोधित करतात. त्यात देशासमोरील राजकीय, आर्थिक, सामाजिक व नैतिक प्रश्नांची अचूक मांडणी केली आहे. वीरप्पनच्या ब्लॅकमेलिंगच्या राजकारणाचा अप्रत्यक्ष संदर्भ देऊन राष्ट्रपती के. आर. नारायणन यांनी म्हटले आहे की, देशातील पट्टीचे गुन्हेगार, गुंडांच्या टोळ्या, राजकीय व्यक्ती आणि समाजातील प्रतिष्ठित मंडळी यांचे एक संगनमती जाळे तयार झाले आहे. त्यांनीच आज देशाला वेठीला धरले आहे. त्याचबरोबर समाजात एक वेगळीच असहिष्णुता आणि असंवेदनक्षमताही आली आहे. एकूण सदसद्विवेकबुध्दी 'सार्वत्रिक

(पृ.२ वर पुढे चालू)

**मराठे प्रतिष्ठान**

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ सभा**

महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात येते. तसेच चौथ्या शनिवारी गरजेनुसार कार्यकारी मंडळ आणि उपसमित्यांचे निमंत्रक यांची संयुक्त सभा घेण्यात येते. त्यामुळे उपसमित्या आणि कार्यकारी मंडळ यांचेमधे परस्पर संपर्काचे सातत्य रहायला मदत होते. कार्यकारी मंडळाच्या सभेच्या दिवशी ५ वाजता कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो.

मागील तिमाहीत १० व २४ जून, ८ जुलै व १२ ऑगस्ट रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. विशेष म्हणजे **प्रतिष्ठानचे विश्वस्त आनंद यशवंत** (पृ. २७७) हे जूनमधील दोन्ही सभांना तर दुसरे **विश्वस्त अरविंद दामोदर** (पृ. २९२) हे १० जूनच्या सभेला उपस्थित होते.

**वार्षिक सर्वसाधारण सभा - पूर्वसूचना**

**प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, ५ नोव्हेंबर २००० रोजी सकाळी ९॥ वाजता** घेण्याचे ठरविण्यात आले आहे. सभेची रीतसर सूचना व विषयपत्रिका यथाकाल येईलच. तो दिवस सभेसाठी मोकळा ठेवण्यासाठी ही पूर्वसूचना.

**डॉ. शरद मराठे यांचा राजीनामा**

**वैद्यकीय उपसमितीचे निमंत्रक डॉ. शरदचंद्र दत्तात्रय** (पृ. ४१७) हे मुंबईहून पुण्यास कायम वास्तव्यासाठी गेल्यामुळे त्यांनी वैद्यकीय उपसमितीचे निमंत्रक म्हणून यापुढे काम करणे शक्य होणार नाही असे कळवून आपला राजीनामा मंजूर व्हावा अशी विनंती केली. त्यांनी वैद्यकीय समितीमार्फत तज्ज्ञ डॉक्टरांची व्याख्याने आयोजित करून प्रतिष्ठानच्या कार्यात जे मोलाचे योगदान दिले त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्यांचा राजीनामा स्वीकारण्यात आला.

**कार्यालय व्यवस्थापक - मधुसूदन कृष्ण**

प्रतिष्ठानचे एक सभासद **मधुसूदन कृष्ण** (पृ. १५९) हे नुकतेच महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून निवृत्त झाले. त्यांनी प्रतिष्ठानच्या कार्यालयीन कामकाजाची जबाबदारी स्वीकारण्याचे मान्य केले आहे. **दर मंगळवार आणि गुरुवारी सकाळी ११ ते १ या वेळात ते नियमितपणे प्रतिष्ठानच्या कार्यालयांत उपस्थित राहणार आहेत.** प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाच्या सभांनाहि त्यांनी कायम निमंत्रित म्हणून उपस्थित राहण्याचे मान्य केले आहे.

*पुढील पानावर*

*वाचा आणि विचार करा - पृ. १ वरून*

रजेवर' गेली असल्यासारखी स्थिती असल्याने आता लोकांच्या चांगुलपणावर वा सुज्ञपणावर विसंबण्यापेक्षा कायदेच अशा रीतीने करायची वेळ आली आहे की, ज्यामुळे समाजाला योग्य वळण लागेल असे राष्ट्रपतींनी म्हटले आहे. परंतु त्यामुळे पुन्हा प्रश्न उरतोच, कारण कायदे संसदेत वा विधिमंडळात होतात. तेथे जाण्यासाठी निवडणुका घ्याव्या लागतात, त्या निवडणुकात सहभागी होणारे, जसे काही चांगले लोक असतात, तसेच काही गुन्हेगारी प्रवृत्तीचेही असतात. काहीजण नुसतेच प्रवाहपतीत असतात. परिणामी एकूण व्यवस्थेवर अपप्रवृत्ती कब्जा करतात.

*- महाराष्ट्र टाईम्स, अग्रलेख १६.८.२०००*

३) **वीरप्पनने वेठीला धरले देशाला**

गेल्या काही वर्षापासून वीरप्पन नावाच्या चंदनतस्कराने केवळ कर्नाटक आणि तामिळनाडू या दोन राज्यांनाच नव्हे तर संपूर्ण देशालाच वेठीला धरले आहे. तो अव्वल दर्जाचा बदमाश असल्याचे सरकारनेच वारंवार घोषित केले आहे. त्याने स्वतः वा त्याच्या साथीदारांनी नागरी प्रदेशात प्रवेश करून प्रसिध्द कन्नड अभिनेता राजकुमार यांचे अपहरण केले आणि या अभिनेत्यासह सर्वजण पुन्हा जंगलात अदृश्य झाले. त्याचा ठावठिकाणा पोलीस आणि लष्कर यापैकी कोणालाही सापडत नाही. परंतु एक पत्रकार मात्र पाहिजे त्या वेळी वीरप्पनची भेट घेऊ शकतो, त्याच्याशी चर्चा करू शकतो, सुखरूप माघारी येऊ शकतो आणि गरज भासल्यास पुन्हा जंगलात प्रवेश करून वीरप्पनशी वाटाघाटी करू शकतो, हा सर्व घटनाक्रम बघितल्यानंतर **वीरप्पन कायद्याच्या रक्षकांच्या हाती येत नाही ही बाब सर्व सामान्यांना भाकडकथा वाटली तर त्यात त्यांचा दोष नाही.** वीरप्पन खरोखरी फरार नसून त्याला संरक्षण पुरविले जात आहे अशी घट्ट धारणा लोकांच्या मनात रुजू लागली आहे. *- लोकसत्ता २१.८.२०००*

४) **पालिकेतील खाबूगिरी**

मुंबई महानगरपालिकेचा वार्षिक अर्थसंकल्प सुमारे २६०० कोटी रुपयांचा आहे. पालिकेच्या दाव्यानुसार, यातील सुमारे ७० टक्क्यांपेक्षाही अधिक निधी हा कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च केला जातो. त्यामुळे विकासात्मक कामांसाठी पैसा उरत नाही. विशेष म्हणजे, शहरीकरणाचा वेग विलक्षण गतीने वाढत असून, नागरिकांच्या पालिकेकडून असलेल्या अपेक्षाहि वाढलेल्या आहेत. नेमक्या याच काळात पालिकेचा कारभार खालावलेला असून, भ्रष्टाचार तर कळसास पोचलेला आहे. आता मुंबई महापालिकेची सूत्रे व्ही. रंगनाथन यांच्यासारख्या कर्तव्यकठोर व्यक्तीच्या हाती आहेत. अतिरिक्त आयुक्त सुबोधकुमार यांच्यासारख्या अधिकाऱ्याचे त्यांना सहकार्य आहे. या पार्श्वभूमीवर पश्चिम उपनगरातील आठ रुग्णालयांच्या दुरुस्तीचे काम कंत्राटदाराने केलेले नसताना, त्याची बिले मंजूर करून जवळपास दीड कोटी रुपयांचा अपहार करण्यास मदत केल्याच्या प्रकरणी **महापालिकेच्या सोळा अभियंत्यांना निलंबित करण्यात आले आहे. याखेरीज बारा कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात येत आहे.** रुग्णालयाच्या दुरुस्तीचे काम न करताच त्याला पैसे दिले गेले, ही बाब खूपच गंभीर आहे. गरज नसताना काम करणे, आधी काम केलेले असताना पुन्हा तेच काम करणे असे प्रकार घडले आहेत. या प्रकरणात मुख्य अभियंत्यापासून कनिष्ठ अभियंत्यापर्यंत अनेकांचा समावेश आहे. यामध्ये काही राजकारणी देखील गुंतले असून, स्थायी समितीच्या सदस्यांना हाताशी धरून काही व्यवहार झाल्याचा आरोप आहे. शिवाय **हा भ्रष्टाचार म्हणजे हिमनगाचे केवळ टोक आहे. जकात, परवाने, नवीन प्रकल्प या विभागांतील भ्रष्टाचार खणून काढला, तर पालिकेचा पैसा वाचेलच, शिवाय महसूल देखील वाढेल.**


- महाराष्ट्र टाईम्स, 'धावते जग', २८.८.२००० ***



Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

### सहस्रचंद्रदर्शनी वामन आत्माराम



पुणे शाखेचे प्रेरणास्थान **वामन आत्माराम (पृ. ३६६) ऊर्फ आण्णा** यांना २५ ऑगस्ट २००० रोजी ८० वर्षे पूर्ण झाली. मात्र उत्साह अजूनहि तरुणांना लाजवणारा. त्यांना बरे नाही असे कळले म्हणून पत्र लिहिले असता ३१.७.२००० चे त्यांचे उत्तरच पहा ना -

''मध्यंतरी ३-४ महिने माझी तब्येत बरी नव्हती. नेहमीची ॲसिडिटी, उन्हाळा शिवाय डिप्रेशन ऑफ माईड हा रोग. पुरातनकाळापासूनचा आहे. अर्जुनाला झाला होता, तो श्रीकृष्णाने बरा केला. चर्चिललाहि झाला होता. औषध व पथ्य यामुळे बरा झाला. २ मैल फिरणे, भरपूर वाचन वगैरे मन रमविण्याचे काम. त्यामुळे झपाट्याने बरा झाला. मला विवंचना अजिबात नाहीत. केवळ नशिबामुळेच झाले. ८० वर्षे पूर्ण होणार म्हणजे म्हातारपणची दुखणी येणारच. सहस्रचंद्रदर्शन २५.८ नंतर होईल. तब्येत सुधारत आहे. सौ. चीहि तब्येत बरी आहे. - अण्णा मराठे''

अण्णांच्या पत्रांत दिसणारा जीवनाकडे पाहण्याचा निकोप दृष्टिकोन तसेच त्यांनी डिप्रेशनवर सांगितलेली औषधयोजना या दोन्ही गोष्टी सूर्वांनीच आवर्जून आत्मसात कराव्या अशा. अण्णा, **'जीवेत शरदः शतम्'** अशा, तुम्हाला सर्व मराठे परिवारीयांतर्फे शुभेच्छा!


### पंत मराठे यांना गुणवंत नागरिक पुरस्कार



सामाजिक कार्यात स्वतःला वाहून घेतलेल्या पंत मराठे **(विष्णू बाळकृष्ण, पृ. ३५९)** यांचा दादा गावकर सामाजिक प्रतिष्ठानचा गुणवंत नागरिक पुरस्कार देऊन नुकताच जाहीर सत्कार करण्यात आला.

आपले संपूर्ण जीवन संघाच्या संस्कारात घडविलेल्या पंत मराठे यांनी जनसंघ व भाजपच्या निधी संकलनाचा हिशेब ठेवण्याचे काम चोखपणे बजावले, असे प्रशंसोद्गार याप्रसंगी मुंबई भाजपचे अध्यक्ष विनोद तावडे यांनी काढले. यावेळी गौरवपत्र, शाल, श्रीफळ व रोख दोन हजार एक रुपये पुरस्कार रूपाने देण्यात आले. **त्यात स्वत:चे तीन हजार रुपये घालून पाच हजार एक रुपये ही रक्कम पंत मराठे यांनी गावकर प्रतिष्ठानला परत दिली.**

### शंतनू अनंत - हाँककाँगमधे



**श्री. शंतनू अनंत** (पृ. ३६५) यांनी अलिकडेच हाँगकाँगला प्रयाण केले असून तेथील 'शांग्रिला हॉटेल्स ॲंड रेसॉर्टस' या कंपनीत चीफ इन्फर्मेशनऑफिसर या पदाची सूत्रे स्वीकारली आहेत. या कंपनीची चीन, जपान, थायलंड, फिलिपिन्स, सिंगापूर, मलेशिया वगैरे देशांत एकूण ३७ फाईव्ह स्टार दर्जाची हॉटेले आहेत. त्यांच्यात व तेथे येणाऱ्या पाहुण्यांत सुसूत्रता राखण्याची जबाबदारी शंतनू यांच्यावर आहे.

शंतनू ३९ वर्षांचे असून ते बनारसच्या इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलाजीचे बी.टेक., तसेच मुंबईच्या बजाज मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटचे एम.एम.एस. आहेत. ते संगणक क्षेत्रातील तज्ज्ञ गणले जातात. हाँगकाँगला जाण्यापूर्वी ते मुंबईच्या एशियन पेंटसमध्ये जनरल मॅनेजर (सिस्टिम्स) या पदावर होते. मराठे परिवाराच्या त्यांना शुभेच्छा!

---

*प्रतिष्ठान वृत्त - मागील पानावरून*

सचिवालय जिमखान्याच्या माध्यमातून सार्वजनिक काम करण्याचा मधुसूदन कृष्ण यांना दीर्घ अनुभव आहे. त्यांनी कार्यालयीन कामकाजाची जबाबदारी स्वीकारल्यामुळे प्रतिष्ठानच्या कामाची कार्यक्षमता आणि परिणामकारकता यामधे निश्चितच वाढ होईल असा विश्वास वाटतो.

### इंजिनिअरिंगची फी भरण्यासाठी कर्ज

पुणे येथील सभासद **रमेश केशव खांबेटे** (पृ. ६७५) यांचा मुलगा प्रसाद याला इंजिनियरिंगची तृतीय वर्षाची फी भरण्यासाठी रु. २०,००० बिनव्याजी कर्ज देण्याचे ठरविण्यात आले.

### विद्यार्थीवर्गासाठी 'प्रश्नमंजुषा'

मागील वार्षिक सर्वसाधारण सभेला जे विद्यार्थी उपस्थित होते त्यांच्यासाठी एक प्रश्नमंजुषेचा कार्यक्रम आयोजित केला होता. गुणवत्ता पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांप्रमाणेच इतरहि सर्व उपस्थित विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम होता.

या स्पर्धेचा निकाल डिसेंबर १९९९च्या हितगुजमधे प्रसिध्द करण्यांत आला होता. पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांची नावे पुनश्च खाली दिली आहेत-

गट १ : **१०वी नंतर शास्त्र विषय घेतलेले**
प्रथम पारितोषिक : (रु. ५० प्रत्येकी)
**अनघा नंदकुमार**, (पृ. ३२२), ठाणे
**नंदन राजेंद्र** (पृ. २९१), ठाणे

गट २ : **१०वी नंतर शास्त्र विषय नसलेले**
प्रथम पारितोषिक : (रु. ५०) **मेघना सदाशिव** (पृ. ३७८), मुंबई

वरील पारितोषिके ५ नोव्हेंबर २००० च्या सभेत दिली जातील. तसेच **याहि वर्षी प्रश्नमंजुषेचा कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे. विद्यार्थीवर्गाने मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमात सहभागी व्हावे.**

***

### अमित अशोक - मिशिगन युनिव्हर्सिटीतं

**गोव्यांतील सभासद अशोक रामचंद्र** (पृ. १८८) **यांचा मुलगा अमित** याची ऑगस्ट २००० पासून मिशिगन युनिव्हर्सिटीत (अमेरिका) एम.एस. करण्यासाठी निवड झाली आहे. मराठे कुटुंबियांतर्फे हार्दिक शुभेच्छा!

Marathe Pratishthan


## विशेष गुणवत्ताधारक विद्यार्थी

**होमी भाभा बालवैज्ञानिक रौप्यपदक विजेती ऋता**



बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक संघटनेमार्फत प्रतिवर्षी इ. ६वी व ९वी साठी लेखी परीक्षा, प्रयोग परीक्षा आणि मुलाखत अशा तीन स्तरावर डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा घेण्यांत येतात. मागील वर्षी झालेल्या या स्पर्धेत प्रतिष्ठानची **माहेरवाशीण सभासद श्रुती करमरकर, बदलापूर यांची मुलगी ऋता** (लक्ष्मण शंकर, पृ. ५२०, यांची नात) हिने इ. ६वीच्या परीक्षेत ठाणे जिल्ह्यांतून रौप्य पदक मिळवले. सर्व मराठे कुटुंबीयांतर्फे अभिनंदन आणि ७वीच्या स्कॉलरशिप परीक्षेतही असेच सुयश मिळो अशा शुभेच्छा!

**प्रियरंजन आनंद - १०वीत गोवा बोर्डात ९वा**



मार्च २००० मधे झालेल्या १०वीच्या परीक्षेत ७५० पैकी ६८२ गुण मिळवून (९०.९३%) **प्रियरंजन आनंद** (पृ. ११५) याने गोवा बोर्डात ९वा क्रमांक पटकावला. मराठे परिवारातर्फे अभिनंदन!

**माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत मुंबईत १८वा सुकृत खांबेटे**


फेब्रुवारी २००० मधे झालेल्या माध्यमिक (७वी) शिष्यवृत्ती परीक्षेत विलेपार्ले मुंबई येथील सभासद **विनायक कृष्णाजी खांबेटे** (पृ. ६९४) **यांचा मुलगा सुकृत** याने ८५.६७% गुण मिळवून मुंबई मधे १९वा क्रमांक मिळवला. सुकृतचे मराठे कुटुंबियांतर्फे अभिनंदन!

**पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यांत ४थी प्रीता -**



फेब्रुवारी २००० मधे झालेल्या पूर्व माध्यमिक (इ. ४थी) शिष्यवृत्ती परीक्षेत प्रतिष्ठानची **माहेरवाशीण सभासद श्रुती करमरकर, यांची मुलगी प्रीता, बदलापूर** (लक्ष्मण शंकर, पृ. ५२० यांची नात) हिने ३०० पैकी २७८ गुण (९२.६७%) मिळवून महाराष्ट्र राज्याच्या गुणवत्ता यादीत ४था तर ठाणे जिल्ह्यात २रा क्रमांक मिळवला. मराठे परिवारातर्फे प्रीताचे खास अभिनंदन!

**मकरंद मधुकर - १०वीत गोवा बोर्डात ४८वा**



साखळी, गोवा येथील कुलबांधव **मकरंद मधुकर** (पृ. ५३८) याने ७५० पैकी ६६२ गुण मिळवून (८८.२७%) मार्च २००० मधे झालेल्या १०वीच्या परीक्षेत गोवा बोर्डात ४८वा क्रमांक मिळवला. मराठे परिवारातर्फे अभिनंदन!

## सहवेदना

१) **वेंगुर्ले येथील कुलबांधव बाळ चिंतामण** (पृ. ४०८) यांचे २१ ऑगस्ट २००० रोजी वृध्दापकाळामुळे निधन झाले. ते ८८ वर्षांचे होते. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो अशी सर्व मराठे कुलबांधवांतर्फे सदिच्छा!

२) प्रतिष्ठानचे **ठाणे येथील सभासद शंकर दामोदर (पृ. ३७१) यांचे धाकटे बंधु जगन्नाथ** यांचे वयाच्या ६५व्या वर्षी २७.८.२००० रोजी निधन झाले. ते वर्षभर कॅन्सरने आजारी होते.

**वरील सर्व मृतांच्या कुटुंबियांच्या दु:खात मराठे परिवार सहभागी आहे.**

## कुलवृत्तांतासाठी सॉफ्टवेअर

आप्त आपटे १९९९ - आपटे कुलवृत्तांत नुकताच प्रसिध्द झाला असून त्यामधे आपटे मंडळींनीच कुलवृत्तांतासाठीच तयार केलेले खास सॉफ्टवेअर वापरले आहे. इतरहि कुलवृत्तांताना ते उपयोगी पडू शकेल. याबाबत मूळपीठिकेतील मजकूर खाली दिला आहे. -

''या कुलवृत्तांतातील वंशवृक्ष जेडणीचे हे प्रचंड काम करण्यासाठी कॉम्प्युटरचा व्यापक वापर करण्यात आला. सर्व माहिती भरण्यासाठी 'डेटा बेस' या प्रकारच्या सॉफ्टवेअरचा वापर तर करण्यात आलाच; शिवाय नावे जोडताना वंशवृक्षाचा शोध घेऊन नवीन नाव कोठे जुळते हे दर्शविणे, सर्व नावांसाठी वंशवृक्ष क्रमांक, पिढी क्रमांक व व्यक्तीचा अनुक्रमांक तयार करणे, मोठ्या वृक्षाचे पुस्तकाच्या एकेका पृष्ठावर मावतील एवढ्या आकाराचे छोटे भाग करणे व एका पृष्ठावरून दुसऱ्या पृष्ठावर जाण्याची दिशा देणारे दर्शक तयार करणे **ही सर्व क्लिष्ट कामे सोपी करणारे खास सॉफ्टवेअर आपटे कुलवृत्तांतासाठी आपटे मंडळींनीच तयार केले. काही छोटे सुयोग्य बदल करून ते इतरत्रहि वापरता येईल.**''

- **मकरंद गोविंद आपटे** (१९५०)
६६, वेंकटगिरी, अणुशक्तिनगर, मुंबई ४०० ०९४.
फोन : ५५७ ६१५६
BARC मधे संदेश दळणवळण विभागप्रमुख

### चारोळ्या

**- कु. सायली सतीश** (पृ. ५५३), पुणे, १२वीची विद्यार्थिनी

त्या फुलाला काहीतरी बोलायचं होतं
त्याचं गुपित माझ्याजवळ सांगायचं होतं
मलाही फुलाचं गुपित ऐकायचं होतं
सुख आणि दु:ख त्याचं झेलायचं होतं

फूल खूप आतुरतेनं माझी वाट पहात होतं
केवळ माझ्यासाठी बिचारं वारा झेलत होतं
त्यादिवशी त्या फुलाशी बोलायचं राहून गेलं
वाट माझी पहात तेही बिचारं कोमेजलं
मला माझ्या कृत्याचं खूप वाईट वाटलं
सुकलेल्या त्या फुलाला मी बंद पेटीत झाकलं

Marathe Pratishthan



# घर

**विनायक केशव** (पृ. २०), वरळी, मुंबई

***माधव गणेश गोडबोले यांची कोकणात घर बांधण्याची कल्पना आणि याबाबत त्यांची मुंबईत लहानाची मोठी झालेली पत्नी नन्नी, अमेरिकेत राहणारा मुलगा विकास, सून वैशाली आणि नातवंडे यांच्या प्रतिक्रिया मागील अंकात ४ पत्रांत व्यक्त झाल्या होत्या. या मतामतांच्या गलबल्यातून शेवटी नन्नीच्या ५व्या पत्रांत या पत्ररूप कथेचा शेवट काय असेल याबाबतचे वाचकांचे विचार मागविले होते.***

***त्यानुसार सीताराम वासुदेव (पृ. १९७। देवळाली कँप, यांनी कळविले की त्या वास्तूवर 'आजोबांचे' छायाचित्र लावण्याचा समारंभ नातेवाईकांसह करावा. त्याच दिवशी 'मराठे प्रतिष्ठान', अनाथाश्रम, कर्वे संस्था अशांना कायम स्वरूपाचे दान करावे म्हणजे मन:शांती व समाधान मिळेल. दुसरा मार्ग नाही.***

***दुसरे वाचक वसंत रावजी (पृ. ११७) खुडीपाट, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग यांनी नन्नीचे 'विकास'ला लिहिलेले प्रदीर्घ पत्रच लिहून पाठवले. 'विकें' इतक्याच ताकदीचे हेहि पत्र आहे. मात्र 'विकें'चे मूळ पत्र आहे 'वैशाली'ला - विकासच्या पत्नीला 'वसंत रावजी' यांचे पत्रहि 'विकें'च्या मूळ पत्रानंतर छापले आहे. 'गुणी गुणं वेत्ति' या न्यायाने 'वसंत रावजीं'ना 'विकें'कडून दिलखुलास दाद नक्कीच मिळेल असा विश्वास वाटतो त्याबरोबरच 'विकें'च्या पत्रातला मूड वसंत रावजींनी बरोबर पकडला. याबद्दल 'विकें'कडून खास पारितोषिक मिळाले तर 'सोन्याला सुगंध'च! - संपादक***

(५)

शिवाजी पार्क, मुंबई

वैशाली,

सगळं संपलं. सारं वादळ शांत झालं. रात्रीचा दुधाचा कप रिकामा करून मनाचे श्लोक पुटपुटत अंथरुणावर लवंडणारे हे त्या दिवशी कागद लेखणी घेऊन बसले. म्हणाले ''मी सगळ्या आठवणी लिहून काढतो.'' मी वैतागले, ''आत्ताची वेळ लिखापढ करण्याची आहे का? चक्कर येते म्हणून सकाळी नाक्यावरून परत आलात. रात्री पानावरून उठताना मला सावरावं लागलं. काही विचार करा. आहेत का मुलंबाळं आपल्याजवळ? सकाळी उठून काय लिहायच्या त्या आठवणी लिहा. चला. अंथरुणावर पडा पाहू.''

''सकाळचं कोणी पाहिलं आहे? थांब, निदान चार ओळी तरी लिहितो हातासरशी'' हट्टानी त्यांनी कागदावर खरडलं. घडी करून त्यावर चष्मा ठेवला आणि ते अंथरुणावर लवंडले.

वैशाली, तेच त्यांचे शेवटचे शब्द.

त्यांना सकाळी सहा वाजता चहा लागत असे. स्वतः उठून चहा कधी केला नाही. मी उठावं म्हणून सगळे दिवे लावून ठेवीत. मग मी नाईलाजाने उठत असे आणि चडफडत, त्यांच्या गद्यात 'मंगलाचरण' म्हणत, चहा करीत असे. त्या सकाळी सहा झाले, साडे सहा झाले. दिवे काही लागले नाहीत. मला आश्चर्यच वाटलं. म्हटलं मी मुळीच उठवणार नाही. झोपू देत किती झोपायचे ते. सावकाश चहा केला. मुद्दाम खरखर आवाज करणारं स्टूल जोरानी खेचत पलंगाजवळ नेलं. पण हूं नाही की चूं नाही.

मी कसातरी कप स्टुलावर ठेवला आणि उठवायला गेले. बाई ग! काल्यासारखं अंग गार होतं. काय समजायचं ते मी समजले. संसारासाठी अखंड धडपड करणारे, मनासारखी गोष्ट झाली नाही की आदळआपट करणारे, पण थोड्या वेळात सगळं विसरून जाणारे, विकासच्या शिक्षणासाठी पैसा हवा म्हणून मला न कळू देता जुन्या बाजारातून कपडे आणणारे. त्यांनी जिवाचं रान केलं आणि कोणाही पुढे हात न पसरता विकासचं शिक्षण पार पाडलं. तुला माहीत आहे, तुम्ही अमेरिकेला गेलात त्या वर्षी ते रिटायर झाले. नियमित पगार बंद झाला. पेन्शनचे दिवस सुरू झाले. त्यांचा एकच ध्यास, एकच स्वप्न, कोकणांत घर बांधायचं. अखेर त्यांचा चेहरा शांत होता. गाढ झोपी गेलेल्या मुलाच्या चेहऱ्यासारखा. कुठे गेले ते कष्ट? त्या निराशा? तो नाकावरचा राग? घरासाठी हट्ट करताना त्यांचं क्षणांत रागावणं, क्षणात निराशेनी मान झटकणं?

टेबलावरच्या चष्म्याखालचा कागद वाचू लागले.

''मला शब्द नाही पाळता आला. नाही घर बांधता आलं. माझ्या मानेवर बसलेलं घराचं भूत माझ्याबरोबर जग सोडून जाऊ दे. आता एकच शेवटचा हट्ट. मी रेखाटलेले घराचे नकाशे, घराचे हिशेब सारं काही एकत्र एका पिशवीत भरा आणि माझ्या प्रेताबरोबर स्मशानात पाठवून द्या. नाव नको कोणी काढायला पुन्हा घराचं. वैशालीला म्हणावं तू बोललीस, घर बांधायला तयार झालीस यातच सर्व काही आलं. आता मी नसलेलं घर बांधून माझ्या आठवणी पुन्हा उजळू नका. मला आयुष्यात काहीच करता आलं नाही. सर्व खर्च करून खिशांत चार पैसे खुळखुळत आहेत असा दिवस माझ्या आयुष्यात उजाडलाच नाही. लागलेली आग विझविण्यात सगळे दिवस गेले. माझं स्थळ निवडून हिने निखारेच पदरात घेतले. दुसऱ्या घरी विकास जन्माला आला असता तर अधिक यश प्राप्त करता आलं असतं. वैशाली म्हणते तिला माझा अभिमान वाटतो. काय आहे माझ्यात अभिमान वाटण्यासारखं? सासरा म्हणून कोणती तिची हौस मी पार पाडली? खरंच मी कोणासाठी काही केलं नाही. माझ्यासाठीसुध्दा मला काही करता आलं नाही. पूर्वजांचं घर सोडून मुंबईला आलो. पाहुणा म्हणून राहिलो. आता मी

Marathe Pratishthan

मोठ्या घरात जातोय. सोडलेल्या घराचे पाश काही तोडता आले नाहीत. हाही एक पराभवच नाही का? जाता जाता एकच विनंती - मला, माझ्या घराच्या वेडासह, विसरून जा.''

वैशाली, विकास अमेरिकेला परतल्यावर सर्व हकीगत सांगेलच. पण उरांत साठलेली दुःखं आता नाही पेलवत. म्हणून हे पत्र लिहून मोकळं होता येतं का बघतेयं. खरं तर डोळ्यातली आसवं काही थांबत नाहीत. एका हातानी डोळे पुसत मी पत्र लिहीत आहे.

वैशाली, तू माझी काळजी मुळीच करू नकोस. हे चिठ्ठीत म्हणताहेत ना घराचे पाश तोडलेले नाहीत म्हणून. माझी खात्री आहे वैशाली, सकाळचा चहा न पिता मला फसवून ते त्यांच्या मोठ्या घरी गेलेत. जाऊ देत. तिथे कोण त्यांना सकाळीच चहा देणार आहे? मीच सकाळी दोन कप चहा करते. एक कप स्टुलावर ठेवून देते. दोन मिनिटं वाट बघते. नैवेद्य दाखवतात ना तसं. मग त्यांच्या ओठानी पिऊन टाकते.

सगळे कागदपत्र पिशवीत भरून स्मशानात न्यायला सांगितलं. बघितलंस, शेवटच्या क्षणीसुध्दा नाकावरचा राग गेला नव्हता. ते ढीग सांगतील. मी ऐकणारी थोडीच आहे? मी विकासला स्पष्ट सांगितलं. फंडाचे गुंतवलेले पैसे परत घ्यायचे आणि कोकणांत छोटसं का होईना पण घर बांधायचं. मला मेलीला एकटीला किती पैसा लागणार? फॅमिली पेन्शनमध्ये मी भागवीन. नाहीतर माझं शिवणाचं मशीन आहे ना? मीठ मिरची पुरते पैसे सहज मिळतील. घराची एक पडवी आपल्याला ठेवायची आणि बाकीचं घर शाळेला द्यायचं. चांगली देखभाल होईल. मुलांचा राबता राहील.

विकास मला अमेरिकेला यायचा आग्रह करीत होता. तू सुध्दा करशील. पण वैशाली, मलासुध्दा दादरच्या घराचे पाश तोडता येणार नाहीत. आणि कोकणांत घर बांधून आणखी एक पाश मी निर्माण करणार आहे. या पाशांच्या कोषात आपण आहोत म्हणून सारी नाती सांभाळीत माणूस म्हणून जगतो आहोत. घर कोसळलं, जळलं तरी हे पाश नष्ट होत नाहीत. पण हे शहाणपण ते मोठ्या घरी गेल्यावर मला प्राप्त झालं. नाहीतर त्यांना घरासाठी तळमळत ठेवण्याचं पाप आपल्या हातून कधीच घडलं नसतं.

वैशाली, इथंच थांबते. नाहीतर कंटाळून माझी पुढची पत्रं तू वाचणार नाहीस.

तुझी आणि सर्वांची

**नन्री**

---

### वसंत रावजी यांनी लिहिलेले पत्र

शिवाजी पार्क, मुंबई

चि. विकास यांस, सप्रेम आशीर्वाद,

हल्ली आपली पत्रोपत्री होते त्यात कोकणातलं घर हा अगदी तव्यावरील गरम भाकरी इतका हॉट विषय असतो. आपण प्रत्येकजण आपापले मुद्दे रेटून, घर का हवं, का नको, अगदी हिरीरीने मांडतो. प्रत्यक्ष पुढ्यात असतो तर दोन-तटात भांडणही झाली असती, इतकी मतं भिन्न आहेत. सासरेबुवा, सूनबाई, नातवंडे असा मोठा ग्रुप, तर तुझा माझा लहान. दोघांचीही मतं पराकोटीची विरुध्द. चि. सौ. वैशालीने माझ्या पत्रातील मुद्दे खोडताना आपलं मत मांडले आहे. ती म्हणते 'सुनेच्या घरात गोडबोले रहातो असं लोक म्हणतील. परंतु त्यांच्या सर्व टीकेला तोंड देण्याइतके बाबा समर्थ आहेत. आणि सून तर कुणाची, शेवटी गोडबोल्यांचीच ना! तिने किंवा मुलाने घरात पैसा घातला तर जगावेगळं काय केलं! तुमची पेन्शन, तुमचा फंड यावर तुम्ही गुजराण करता ती तशी केलीच पाहिजे. दुसऱ्याकडे पैसा मागणं ही शरमेची बाब आहे हे मलाही पटतं. 'अंथरूण पाहून पाय पसरावे' अशी शिकवण आम्हालासुध्दा मिळाली आहे. परंतु मुलांना वाढवताना, त्यांच्यावर संस्कार करताना, आई बाबांनी काढलेल्या खस्ता विसरून चालतील का? मुलांचं त्यांचे प्रत काही देणं लागतच की नाही? तुम्ही आम्हाला तुमच्यापासून वेगळी मानत नाही, तर आमचा पैसा फक्त वेगळा कसा असेल? मग मुलगा-सून, आई-बाबा, ही अगदी जवळची नाती निर्माण कशाला होतील?' सूनबाईचं म्हणणं पटतं.

तिने आपल्या पत्रात आणखी एक मुद्दा मांडला आहे. 'आपले बाबा मनस्वी आहेत हे तुम्हीच म्हणता. मग त्यांची कोकणातलं घर ही छानशी कल्पना साकार करून त्यांना त्यांच्या वृध्दापकाळात आनंदी ठेवण्याचं भाग्य जर आम्हाला मिळत असेल तर ते आम्ही मुलांनी का नाकारायचं?' हे तिचे म्हणणे माझ्या मनाला फार लागून राहिले. खरंच! जर त्यांची कल्पना साकार झाली तर, फंड, पेन्शन, पैसा सारं विसरून ते त्या घरासाठी अगदी बालवयाचे होतील. हातात कुदळ, फावडं घेऊन घराचा पाया खणण्याइतका जोर त्यांच्या हातात येईल. मजेशीर कल्पना मनात येऊन गेली. आम्ही घर बांधण्याचे निश्चित करतो. हे त्या कल्पनेने एवढे आनंदित होतात की रातराणी पकडून ते कोकणात जातात. शेजारच्या अंतूकाकांना हाक मारून 'मी आलो आहे रे' म्हणून सांगतात. त्यांच्या सोबतीने घराची आखणी करतात. आणि स्वतः पंचा नेसून घराचा पाया खणू लागतात.'

वैशालीचं हे पत्र मला वेगळा विचार करण्यास प्रवृत्त करतं. ती म्हणते 'येथे अमेरिकेत कुटुंब विभक्त होऊन, कुटुंबसंस्था लयाला चालली आहे. अजूनही भारतात ती चांगल्या प्रकारे चालली आहे. आमचं कोकणातलं घर झालं तर आजी, आजोबा, सून, मुलगा व नातवंडं एकाच घरात कशी छान दिसतील हे चित्र मनात येत आणि वाटतं, काहीही झालं तरी हे घर झालंच पाहिजे, आपण भारतीय चुकीचं अनुकरण झटकन करतो. परंतु चांगलं करण्यास मात्र बरेच आढेवेढे घेतो. तुमची नातवंडं, कोकणातलं घर होणार, आम्ही तेथे जाणार असे सांगतात. तर तुम्ही मात्र आपल्या मुळाकडे जाण्यास नाखूष आहात. मी येथेच वाढले, मोठी झाले. मुलं तर येथेच जन्माला आली, वाढली. आजूबाजूला वातावरण येथल्या संस्कृतीचं, तरीहि मी माझं भारतीय आणि मराठीपण टिकविण्यासाठी मराठी चांगलं शिकले. मुलांवरही तेच संस्कार करून, त्यांना आपले सण, समारंभ याची माहिती दिली. यथील भारतीय एकत्र जमून काही सण पार पाडतात. तिथे त्यांना घेऊन जातो. यामुळे भारताबद्दल त्यांना कुतुहल आहे. एक ओढ निर्माण झाली आहे. माझी ओढ तर भारताकडे व त्यातही बाबांनी रेखाटलेल्या सुंदर घराकडे. तुम्हाला मुंबई आवडणं मी समजू शकते, परंतु कोकण का वाईट हे मात्र समजू शकत नाही. पिकनिकसाठी आपण चार-आठ दिवस दुसरीकडे जातो. ते घर, तो परिसर आपणाला इतका आवडतो

Marathi Pratishthan

की ते चार-आठ दिवस कमीच होतात. कोकणातलं घर म्हणजे असाच पिकनिक स्पॉट असं जर तुम्ही समजलात तर तुमचं मत बदलेल. कालांतराने तुम्हाले ते आवडू लागेल.'

तिथे प्रदुषण नाही. गटाराचं पाणी रस्त्यावरून वहात नाही. आजूबाजूला झोपडपट्टीचे मोहोळ नाही. रस्त्यांवर पोंपों असा कर्णकर्कश आवाज करणारी वाहने नाहीत, असं कोकण. सुंदरशी चिमुकली पायवाट, लांबपर्यंत पसरलेली कुरणं, आंब्याच्या बागा, घरामागचं परसू, त्यात विविध रंगाची, आकाराची, वासाची फुलं, माडा-पोफळीची उंच उंच वाढलेली झाडं, स्वतःची नसली तरी शेजारची हंबरणारी गाय. शेजारून ऐकू येणारं कोंबड्याचं आरवणं. घरातील मातीची जमीन शेणानं सारवून हिरवट काळी झालेली. त्यावरची शुभ्र रांगोळी. मागील दाराची तुळस. जवळच्या विहिरीचं रहाटानं आणलेलं पाणी, सुरेख लालसर रंगाचं तांब्याचं घंगाळ, त्यात गरमागरम पाणी, आणि मनसोक्त केलेली आंघोळ असं कोकण कुणाला नकोस होईल? आजोबा कुरकुरणाऱ्या झोपाळ्यावर बसले आहेत. नातवंडं समोर अंगणात खेळत आहेत. आजी पडवीत बसून त्यांचे खेळ डोळे भरून पहात आहे. हे चित्र डोळ्यापुढे आलं की मन हरखून जातं.

ती आपल्या पत्रात म्हणते, की तुम्ही विचारता मी अमेरिकेतून तिकडे कशी येणार? अहो इच्छा असेल तर मार्ग सापडतोच. आडवाटेची वाट करूनसुध्दा आपल्या ओढीच्या ठिकाणी मनुष्य पोचतो. मी तर तेथे येण्यास आसुसलेली. विमानतळावरून तडक मुंबईत न थांबता तिकडे येईन. दोन-चार वर्षांतून एकदा जरी मी तिकडे आले, आठ दिवस राहिले, तरी ते मला येथल्या रेडीमेड जगण्यातून मिळणाऱ्या आनंदापेक्षा जास्त आहे. चार दिवसांपूर्वी लेले फर्निचरवाले आले होते. हे त्यावेळी घरी नव्हते. बराच वेळ बसले. त्यांनीच विषय काढला, का हो वहिनी, गोडबोले म्हणतात तसं खरचं तुमच्या कोकणातल्या घराचं निश्चित झालं? 'अहो कुठे, हे सगळं त्यांचं स्वप्न आहे. माझा आणि विकासचा याला विरोध आहे' मी सांगितलं त्यावर ते विचारतात सुनबाई काय म्हणतात? 'सुनबाई सासऱ्याचा विचार अगदी उचलून धरतात. तिला तर हे घर किती लवकर होईल असं झालं आहे'

त्यावर लेले काका म्हणतात, 'अहो, तुम्ही भाग्यवान आहात. मुलांना अमेरिका सोडायची असते, परंतु त्यांच्या बायका ती सोडू देत नाहीत. तुमच्या येथे तर अगदी उलट चित्र दिसतं.' खरंच तुम्ही कोकणातलं घर बांधाच. आम्हाला आमचा गाव सुध्दा माहीत नाही. या चाळीत आमच्या तीन पिढ्या गेल्या. सकाळी उठून रांग लावून पाणी भरा. चर्नीरोड स्टेशनवर गाडी पकडा. संध्याकाळी घामट शरीराने आणि कोमेजल्या मनाने दोन खोल्यांच्या खुराड्यांत या. रात्री जागेची बचत करून झोपा. इकडचा पाया तिकडे झाला तरी शेजारच्या झोपलेल्या माणसाला लागायचा. प्रायव्हसी मिळालीच नाही. आमचं जग म्हणजे गिरगाव चौपाटी आणि राणीचा बाग. अशा मोकळ्या घराची कल्पना किती आनंद देऊन जाते. आम्हीही तुमच्याकडे चार दिवस रहायला येऊ. सूनबाई म्हणतात तर ही संधी सोडू नका. कदाचित् तुमची नातवंडं या देशात परत येऊन काही वेगळं करतील! अहो काही सांगता येत नाही. पूर्व संकेत असतात. कसे आणि कधी फळाला येतील!' गोडबोले काकांनी जे चित्र उभं केलं ते अगदी फ्रेम करून ठेवण्याइतकं सुंदर आहे. ऐकताना मलाही वाटू लागलं, खरोखरच उतरंड्या छपराचं लाल कौलाचं स्वतःच घर असावं. आजूबाजूची ही सिमेंटची जंगलं, घर न वाटता फक्त इमारती वाटतात. वनस्पती तुपाच्या डब्यात लावलेल्या गॅलेरीत टांगलेल्या तुळशी. शी! कल्पनाच करवत नाही. पण इलाज नाही. 'तुम्ही वेगळं करू शकता. जरूर करा.' लेले आपलं म्हणणं प्रभावीपणे मांडत होते. मी ते ऐकून घेत होते.

विकास, खरं म्हणजे हे सर्व ऐकल्यावर, मी चुकत नाही ना, असं वाटू लागतं. सर्वांनाच आवडणारी कल्पना, येथली असूनही मलाच का आवडत नाही? तुझं ठीक आहे. तू इकडच्या पेक्षा तिकडे जास्त चांगलं आयुष्य जगत आहेस. मुंबई आणि एकूण भारतीय नगरं बकाल झाली आहेत. तुला त्यांचा वीट येणं समजू शकते. पण माझं तर याच ठिकाणी आयुष्य गेलं. मनात धरलेल्या कल्पना चटकन् पुसून टाकता येत नाहीत. किंवा त्या न पुसण्याचा अट्टाहास! काहीहि म्हण. तिकडेसुध्दा एक दोनदा आले. पहाण्यासारखं भरपूर आहे. पण भारतात आयुष्य घालविलेल्या माणसाला रहाण्यासारखं थोडंच आहे! मी याबाबत सध्यातरी अलिप्त रहाणार आहे. तुम्ही होय म्हटलंत तर माझा नकार नाही. नाही ठरलं तर आग्रह नाही. तुम्ही दोघांनी विचार करून अंतिम निर्णय घ्या. आनंदात राहणं हे महत्त्वाचं. चि. सौ. वैशालीसह मुलांना आशीर्वाद.

तुझी आणि सर्वांची

**नन्नी**

***

## Philosophy of Life

**Nilambari Ramesh** (Page 280)
Pune. Ph. 4456270

| | |
|---|---|
| 1. Life is a challenge | meet it |
| 2. Life is a struggle | fight it |
| 3. Life is a tragedy | face it |
| 4. Life is a duty | perform it |
| 5. Life is a game | play it |
| 6. Life is a song | sing it |
| 7. Life is a love | enjoy it |
| 8. Life is a dream | realise it |
| 9. Life is a beauty | worship it |
| 10. Life is a promise | fulfil it |
| 11. Life is a journey | complete it |
| 12. Life is a flower | smell it |
| 13. Life is a test | pass it |
| 14. Life is a book | read it |
| 15. Life is a gift | accept it |
| 16. Life is a sorrow | overcome it |
| 17. Life is a puzzle | solve it |
| 18. Life is an apportunity | take it |
| 19. Life is an adventure | dare it |
| 20. Life is a bless | taste it |

### खुषीपत्र

हितगुज अंकाची वाट पाहत असतो. अंकातील नाविन्य व वेगळया पध्दतीचे लेख काय आहेत याची उत्सुकता असते.

अधूनमधून लेख पाठवला तर चालेल का? - **भा. द. मराठे**

*(लेख जरूर पाठवा. कृपया आपले पूर्ण नांव (फक्त अद्याक्षरे नव्हे) व पिनकोडसह पत्ता लिहावा. - **संपादक**)*

Marathe Pratishthan

# झोपाळ्यावरचे रामायण



*(डावीकडून उजवीकडे) श्रीराम व्यंकटेश, राम गबाले, शांताबाई शेळके आणि डॉ. अरुणा ढेरे*

**कै. डॉ. व्यंकटेश धोंडदेव** (पृ. ४३) यांच्या 'झोपाळ्यावरचे रामायण' या ओवीबध्द काव्यमय ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन सिध्दहस्त लेखिका व सुप्रसिध्द कवयित्री मा. शांता शेळके यांच्या शुभहस्ते सोमवार दि. ८.५.२००० रोजी पुण्यात झाले. त्याप्रसंगी सुप्रसिध्द कवयित्री डॉ. अरुणा ढेरे व सुप्रसिध्द चित्रपट दिग्दर्शक व निर्माते श्री. राम गबाले यांचीही भाषणे झाली. डॉ. अरुणा ढेरे यांनी या दुसऱ्या आवृत्तीला प्रस्तावना लिहिली आहे.

सन १९१८ साली प्रथम प्रसिध्द झालेल्या या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीला भारताचार्य कै. चिं. वि. वैद्य यांची प्रस्तावना लाभली होती. 'झोपाळ्यावरचे रामायण'ला प्रस्तावना मिळावी म्हणून डॉ. मराठे लोकमान्य टिळकांकडे गेले. डॉ. मराठे हे ब्रिटिश सरकारच्या सेवेत असल्यामुळे आपली प्रस्तावना अडचणीची ठरु शकेल असे सांगून लोकमान्यांनी कै. रा. ब. चिंतामण विनायक वैद्य यांचेकडून प्रस्तावना घेण्यास सुचविले.

विख्यात चित्रकार अनिल उपळेकर यांच्या कुंचल्यातून दुसऱ्या आवृत्तीचे मुखपृष्ठ सजले आहे तर ख्यातनाम चित्रकार प्रभाकर काटे यांनी प्रसंगचित्रे काढली आहेत. पुण्याच्या तुळशीबाग राममंदिरातील श्रीराम, श्रीलक्ष्मण व देवीसीता यांच्या प्रासादिक रंगीत छायाचित्राचा तसेच मे. पिडिलाईट इंडस्ट्रीज मुंबई यांनी प्रसिध्द केलेल्या 'रामदरबार' या सुरेख रंगीत छायाचित्राचा अंतर्भाव असल्याने या दुसऱ्या आवृत्तीचे आकर्षण वाढले आहे. पितृऋण म्हणून सेवानिवृत्तीनंतर श्रीराम व्यंकटेश यांनी हे पुस्तक प्रसिध्द केले आहे. रु. २०० या किंमतीला हा ग्रंथ रसिक वाचकांना उपलब्ध आहेत.

**कुलबांधवांसाठी खास सवलतीची किंमत रु. १५०** (म. ऑ. अथवा S. V. Marathe या नावाने पुण्यातील चेक/DD ने) पुस्तक रजि. पोस्टाने पाठवण्यात येईल. पत्ता : २/६ चंद्रलोकनगरी, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे ४११०२९. फोन : ५४६९२५३.

***

**I'm Possible**
Impossible itself
says I'm POSSIBLE !

---

# मन

- **सौ. विद्या सुनील चक्रदेव** (पृ. ७३३), मुलुंड, मुंबई.

***माणसाचे मन कसे आहे व कोठे आहे याचा पत्ता लागत नाही. तरीही त्याचा प्रचंड पराक्रम क्षणोक्षणी प्रत्ययाला येतो. ते क्षणभरही रिकामे रहात नाही आणि त्याच्या भटकण्याला त्रैलोक्यदेखील अपुरे पडते. त्याला ताब्यात ठेवणे म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्याइतके कठीण आहे.***

मन हेच सर्व प्रवृत्तींचे मूळ आहे. अहंभाव, आशा, इच्छा, कामना, भय यांना मनाचाच आश्रय आहे. मनच माणसाच्या सर्व सुखदु:खांना कारणीभूत आहे; म्हणजे त्याच्या स्थिरतेत सुख आहे तर चंचलतेत दु:ख आहे.

मन अतिशय सूक्ष्म असल्याने त्याचे स्वरूप आकाशातील निळ्या रंगाप्रमाणे किंवा मृगजळावरील लाटांप्रमाणे आभासात्मक वाटते. परंतु त्याचे सामर्थ्य जबरदस्त आहे. विषयाधीन झालेले मन विवेकबुध्दीचा आश्रय करीत नाही. त्यामुळे ते दु:खाला कारणीभूत होते. स्वार्थामुळे मन चंचल होते.

मन जीवनातील सर्व संस्कारांचा संग्रह करते. सर्व विश्वाचे ज्ञान मनात मावू शकते. सर्व विचारांचे साधन मनच आहे. मन असेल त्याप्रमाणे विचार प्रगट होतात व प्रगट झालेल्या विचारांवरून माणसाचे मन कळते.

जोपर्यंत 'मन', 'अमन' होत नाही तोपर्यंत पुनर्जन्म व त्यातील सुखदु:खे व ती भोगण्यासाठी जीवात्म्याचा या योनीतून त्या योनीत व या देहातून त्या देहात प्रवास चालूच राहतो. ज्याप्रमाणे वारा सूक्ष्म गंध आपल्याबरोबर वाहून नेतो, तद्वत मृत्यूसमयी जीवात्मा स्थूल देह सोडताना, मनासहित पाच इंद्रियांना (सूक्ष्म देहाला) शरीराबाहेर घेऊन जातो व नवीन स्थूल देहात प्रवेश करतो व तेथे मनाला हाताशी धरून शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या विषयांचा उपभोग घेतो.

इंद्रिये बलवान आहेत आणि त्यांची विषयांकडे धाव असते. विषयप्राप्तीच्या इच्छेमुळे क्रोध, क्रोधाबरोबर अविचार, अविचाराबरोबर संमोह, संमोहामुळे स्मृतिभ्रंश, स्मृतिभ्रंशामुळे बुध्दीनाश आणि बुध्दीनाशाबरोबर सर्वनाश अशी ही अनर्थ परंपरा ओढवते. सर्व जग त्रिगुणात्मक आहे आणि आपले मनही त्रिगुणात्मक आहे. सत्त्वादि त्रिगुण मनात असतात. त्यांपैकी सत्त्व हा गुण आहे तर रज व तम हे वस्तुत: दोष आहेत.

सद्बुध्दी, सदाचार, सद्भाव हे सारे सत्त्वगुणाचे कार्य आहे; चंचलता, अस्थिरता, लोभ हे रजोगुणाचे कार्य आहे; आणि जडत्व, अपप्रवृत्ति व भ्रम हे सर्व तमाचे कार्य आहे.

पाच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेन्द्रिये ही ज्ञानप्राप्तीची बाह्य साधने आहेत, तर अंत:करण हे आंतरिक साधन आहे व ते बाह्य साधनांपेक्षा अत्यंत सूक्ष्म आहे. अंत:करणात चार शक्ती



Marathe Pratishthan

असल्याने त्यांना अंतःकरण चतुष्टय म्हणतात. त्यात मन, बुध्दी, चित्त व अहंकार येतात.

छांदोग्य उपनिषदात असे सांगितले आहे की मन अन्नमय असून अन्नामुळे बनते. मनाचे शुभाशुभत्व अन्नाच्या पचनक्रियेवर अवलंबून आहे. अन्नाच्या अतिस्थूल भागाची विष्ठा बनते, मध्यम स्थूल तत्त्वापासून मांसादी बनतात व सूक्ष्म भागापासून मन बनते. पवित्र अन्नाने सत्त्वशुध्दी होते. सत्त्वशुध्दीने स्मृती दृढ झाल्याने मनुष्य बंधनमुक्त होतो.

सारांश मन संयमित करणे हीच सुखी जीवनाची गुरूकिल्ली आहे. 'समत्वं योग उच्यते' असे गीता सांगते.

विचार आणि विकार थांबवून मनाची सर्व शक्ती ध्येयासाठी एकत्र केल्यास व त्या शक्तीला ध्यानाने, भक्तीने अगर निष्काम कर्माने किंवा नित्यानित्य विवेक करून शुध्द करीत गेल्यास ती शक्ती अधिकाधिक सूक्ष्म होऊन तिचे रूपांतर आत्मशक्तीत होते. व मग जीव हा शिव होतो. मनाचा स्वभाव सामान्यतः चंचल असला तरी अभ्यास आणि वैराग्याच्या बळावर त्याला स्थिर करता येते.

मन हा देहाचाच भाग असल्यामुळे मनातील विचारांचा परिणाम होऊन शारीरिक रोग उद्भवतात. [illegible] आपल्या [illegible]

* * *

# एक आगळी श्रध्दांजली - दोन प्रतिक्रिया

**प्रतिक्रिया**

*मागील अंकांत सुप्रसिध्द सराफी व्यवसायाचे संस्थापक यशवंत विठ्ठल (पृ. २७७) यांच्या इच्छेनुसार श्राध्द न करता श्राध्ददिनी ब्रिज टूर्नामेंट आयोजित करण्यात येत असल्याचे प्रसिध्द करण्यात आले होते. याबाबत डॉ. पांडुरंग रामचंद्र (पृ. ५१५) धामसे, गोवा आणि वसंत रावजी (पृ. ११७) खुडीपाट, ता. देवगड या दोघांच्या प्रतिक्रिया येथे प्रसिध्द करण्यांत येत आहेत. यापूर्वी डिसेंबर १९९९ च्या अंकांत चिंतामण महादेव (पृ. २२२) यांनीही त्यांच्या पत्नीच्या निधनानंतर तसेच तत्पूर्वी आईच्याहि निधनानंतर समाजाचे ऋण भेटण्याच्या दृष्टीने सामाजिक व शैक्षणिक कार्य करणाऱ्या ५/५ संस्थांना देणग्या दिल्याचे प्रसिध्द करण्यांत आले होते.*

*तत्पूर्वी डिसेंबर १९९५ च्या अंकांत मालाड मुंबई येथील राजा मराठे (राजाराम नारायण पृ. ३२५) यांनी एक वेगळीच 'अनोखी श्राध्द संकल्पना' मांडली होती. आणि त्याआधीच्या सप्टेंबर १९९५ च्या अंकांत पृ. ४ वर 'अनुकरणीय' मधे प्रसिध्द झालेले गजानन चिंतामण (पृ. १२१) पुणे यांचे पत्रहि पहावे. तेव्हापासून आजतागायत ते वडिलांच्या जन्मदिनी (२८ जानेवारी) आणि पुण्यतिथीच्या दिवशी (१३ जुलै) प्रतिष्ठानच्या शैक्षणिक निधीला देणगी पाठवीत आहेत.*

*प्रत्येकाची कौटुंबिक पार्श्वभूमी आणि धर्माचरणाचे वळण याप्रमाणे जो तो त्याला पटेल त्याप्रमाणे असे विधी करीत असतो. - संपादक)*

## मरणोत्तर धार्मिक विधी करणे हे पुत्राचे कर्तव्य!

- **डॉ. पांडुरंग रामचंद्र** (पृ. ५१५), धामसे, गोवा.

'पुन्नामनरकात् त्रायते इति' म्हणजे पुत् नामक नरकापासून जो मात्यापित्यांचे रक्षण करतो, तो पुत्र होय, अशी पुत्र या शब्दाची व्याख्या आहे. (भारतीय संस्कृतीकोश) देव, ऋषि व समाज या तीन ऋणांबरोबरच पितर ऋण फेडणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. मृत पितरांना सद्गति लाभावी, त्यांनी पितृलोकांतून वंशावर कृपादृष्टि ठेवावी, यासाठी पुत्राने मरणोत्तर धार्मिक विधी करावे, असे शास्त्रात सांगितले आहे. पितर स्वर्गात किंवा मोक्षाला गेल्यास अशा विधींची गरज नाही.

एखाद्या सर्दी झालेल्या माणसाने आइस्क्रिम मागितले तरी ते आपण देत नाही, त्याचप्रमाणे एखाद्या व्यक्तीने आपला तेरावा किंवा श्राध्द करू नका असे सांगितले असले तरी त्यांच्या कुटुंबियांनी ते करणे आवश्यक ठरते.

रूढीप्रमाणे श्राध्दाच्यावेळी पुरोहितांनी म्हटलेला संकल्प किती लोकांना कळतो, असा जो प्रश्न संपादकांनी केला आहे, त्यात श्राध्दाला रूढी म्हणणे हे अज्ञानमूलक आहे. काळाच्या कसोटीत टिकून असलेल्या ऋषीमुनींनी फायदा व्हावा यासाठी सात्त्विक पुरोहितांची निवड करणे गरजेचे आहे.

मृत पावलेल्या व्यक्तीचा दिवस इंग्रजी महिन्याऐवजी हिंदु महिना व तिथी याप्रमाणे विचारात घेऊन ब्रिज टूर्नामेंटस खेळविल्या गेल्या, तरीही हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे त्यादिवशी श्राध्दविधी होणे आवश्यक आहे.

***

## रूढी मोडून वेगळे काही केल्यास धर्माचा पायाच कोलमडेल

- **वसंत रावजी** (पृ. ११७), खुडीपाट, ता. देवगड

'एक आगळी श्रध्दांजली' लेखाच्या शेवटी संपादक, श्राध्दाच्यावेळी पुरोहीत संकल्प म्हणतात तो किती लोकांना समजतो व अलिकडच्या पुरोहितांना तरी कळतो का? अशा स्थितीत अशा रूढींना फाटा देऊन वेगळे काहीतरी करावे असे सूचित करतात. परंतु या कारणास्तव वेगळेपणा असावा हे पटत नाही. जवळ जवळ सर्वच हिंदु धार्मिक कृत्ये संस्कृत मंत्राचा वापर करून केली जातात. गरजेप्रमाणे यजमानांकडून कृती करून घेतली जाते आणि विधी पूर्ण झाल्याचे समाधान मानले जाते.



Marathe Pratishthan

कुठल्याही विधीचा बारकाईने अर्थ समजावून घेतला जात नाही. तशी कुणाला गरज भासत नाही. हा विधी सोडून अनेक धार्मिक कृत्ये, परंपरा, श्रध्दा, समाज काय म्हणेल ही भिती, यामुळे केली जातात. त्यात फारसा बदल केला जात नाही. करण्याची गरज भासत नाही. तर हाच विधी त्याला अपवाद का असावा? मंत्रांचा अर्थ समजावून घेण्यापेक्षा समारंभात मिरवणे जास्त महत्वाचे मानले जाते हा अनुभव सर्वानाच आहे. पुरोहितांना अर्थ समजतो का? ह्याबाबत असे म्हणता येईल की, ज्यावेळी ह्या रूढी निर्माण झाल्या त्या वेळचे पुरोहित, त्यांचे आचरण, मांगणी, त्यावेळचा समाज आणि आताचा समाज यात महत् अंतर आहे. मागणी तसा पुरवठा हा जगाचा नियम झाला आहे. पुरोहित यापासून वेगळे कसे असू शकतील?

सर्व धर्मात अशा रूढी आहेत. त्या मोडून वेगळे काही करावयाचे झाल्यास धर्माचा पायाच मोडून पडेल. देवाचे अस्तित्व न मानण्यापासून त्याची सुरवात होईल व इतका अश्रध्दाळू समाज होणे कठीण आहे. नवीन विचाराचे म्हणवणारे सुध्दा ठराविक बाबतीत तो करतात. आपला देह दान करावा, नेत्रदान करावे, असे सांगणारे त्यात क्वचितच असतात.

बदल जरूर हवेत, जास्त कर्मकांड वगळून सोपे मार्ग अनुसरून, वेळ, पैसा यांचा उपयोग निव्वळ कर्मकांड करण्यात न घालविता, समाजोपयोगी कृत्यांसाठी त्याचा जास्त वापर होईल हा दृष्टिकोन ठेवून ते करावेत. ***

### खुषीपत्र

मागील अंकात (जून २०००) **वंदना विश्वास** (पृ. २७७) यांनी एक 'आगळी श्रध्दांजली' वाहिली. परंतु त्या ब्रिज टूर्नामेंटला आम्ही मुकलो. माझ्या माहितीप्रमाणे तिच्या सासऱ्यांबरोबर मी ब्रीज खेळल्याचे आठवते. कारण मी ठाण्याला पुष्कळ टूर्नामेंट खेळलो आहे.

- **सीताराम वासुदेव** (पृ. २९७), देवळाली कँप

# विवाह सहाय्य

***हितगुजच्या वाचकांनी त्यांच्या कुटुंबातील अथवा नात्यांतील किंवा परिचयातील मुला-मुलींची माहिती 'विवाह सहाय्य' या सदरांत प्रसिद्धीसाठी पाठवावी.***

***बहुसंख्य वाचक हे कपिगोत्रीच असणार. त्यामुळे कपिगोत्र नसणाऱ्या मुलां-मुलींची माहिती पाठविण्यात मराठ्यांच्या माहेरवाशिणी फार मोलाचे कार्य करू शकतील.***

***कुलबांधवांकडून आलेली माहिती खाली दिली आहे. इच्छुकांनी संबंधितांशी परस्पर संपर्क साधावा. - संपादक.***

**क्र. ९/२०० वधू** प्रीती आनंद करंदीकर, वय २३, गोरी स्मार्ट, ५'-१'', सडपातळ, BAMS झाली आहे. Housemanship करीत आहे. **अपेक्षा :** शक्यतो डॉक्टर, वय २८ पर्यंत. **संपर्क :** ए. आर. करंदीकर, आर्किटेक्ट, करंदीकरांचा बंगला, स्टेशन रोड, Malmaddi, DHARWAD 580001. फोन : 836-740552.

**क्र. १०/२००० वर** विनित विजय फळणीकर, जन्म १३.४.१९७३, उंची १६५ से.मी., रक्त गट ARH+ve, कऱ्हाडे ब्राह्मण, CA, CS च्या दुसऱ्या पार्टला बसला आहे. सिबा स्पेशालिटी मध्ये (गोरेगांव, मुंबई) मॅनेजर फायनान्स. **अपेक्षा** - शक्यतो कऱ्हाडे ब्राह्मण, CA असावी, नोकरी हवी, उंची १६०-१६२ से.मी. **संपर्क** - श्री. विजय पुरुषोत्तम फळणीकर, १२८, श्री निवास, हिंदु कॉलनी, ५वी गल्ली, दादर, मुंबई ४०० ०१४. फोन - ४१४३२६७.

**क्र. ११/२००० वर** महेशकुमार सुधाकर खांबेटे, गोत्र - कपी, कोकणस्थ, जन्म २८.९.१९७३, M.Sc. Agri. इंडोफील केमिकल्स कंपनीत डेव्हलपमेंट ऑफिसर, ७००० रु. मा. प्राप्ती, उंची ५'५'', रंग - गोरा, रक्तगट - BRH+ve, मुलाचे आईवडील निवृत्त शिक्षक असून दापोलीला राहतात. एक लहान बहीण M.A. करत आहे. मुलगा पुण्यात असून भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहतो. मुलाची आत्या पुण्यात असते त्यामुळे **संपर्कासाठी आत्याचा पत्ता** - श्री. सुनील रघुनाथ फडके B II/6 काकडे पार्क, चिंचवड गांव, पुणे ४११०३३ फोन - ७४५२७१८. **अपेक्षा** - कोणत्याही ब्राह्मण शाखेची व नोकरी करणारी पाहिजे.

**क्र. १२/२००० वर** हेमंत विजय पारखी, जन्म - ३.९.१९७५, देशस्थ ऋग्वेदी, गोत्र - वसिष्ठ, शिक्षण - Metallurgy मधील डिप्लोमा, नोकरी - Pegasus Castalloy Ltd. कंपनीत Engineer Incharge, पगार - ७००० रु., उंची - ५'४'' गहूवर्ण. रक्तगट - O+ve, मुलाला आईवडील नाहीत. (आई नुकतीच वारली त्यामुळे वर्षाच्या आत लग्न करायचे आहे) १ विवाहित बहीण आहे. मुलाचे भोरला स्वतःचे घर आहे. व पुण्यात भाड्याच्या फ्लॅटमधे राहतो. **अपेक्षा** - नोकरीची अट नाही. घराची सर्व जबाबदारी स्वतंत्रपणे पेलू शकणारी व चांगला स्वयंपाक करता येणारी, **संपर्क - मुलाचे मामा** - डॉ. उदय नारायण पेंडसे, 'गुरुप्रसाद', नवी आळी, मु. पो. भोर, जिल्हा - पुणे, पिनकोड ४१२२०६. फोन - २२८४३, २३०५५, पत्रिका पहायची आहे.

**क्र. १३/२००० वर** सिध्दार्थ रघुनाथ जोशी, कोकणस्थ, गोत्र - शांडिल्य, जन्म - १३.७.१९७७, B.A., D.B.M., नोकरी - पी.एम.टी. मशीन टूल्स पिंपरी येथे पर्चेस ऑफिसर, उंची - ५'१०'', गहूवर्ण, पगार - ७००० रु., सुदृढ, आई वडील व एक विवाहित बहीण, स्वतःचे घर, वडीलही त्याच्याच कंपनीत सुपरवायझर आहेत. **अपेक्षा** - पदवीधर, नोकरी करणारी, उंची ५'४'' पर्यंत. कोणत्याही ब्राह्मण शाखेची, **संपर्क** - श्री. रघुनाथ नारायण जोशी, A3, फ्लॅट नं. २७, निंबजनगर, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे ४११०५१ फोन - ४३५८५०६.

**क्र. १४/२००० वर** केदार शरद कुलकर्णी,



Marathe Pratishthan

देशस्थ ऋग्वेदी, वय २७, D.M.E. दमण-गुजराथ येथे खाजगी कंपनीत इंजिनियर, पगार - १०,००० रु., ५'३'', निमगोरा, सडपातळ, मुलाला आई वडील, एक विवाहित भाऊ व एक बहीण (विवाहित) आहे. सर्वजण मिरजेला असतात. मुलगा नोकरीनिमित्त एकटाच दमणला असतो. **अपेक्षा** - पदवीधर, गोरी, दमणला राहण्याची तयारी असावी, कोणत्याही ब्राह्मण पोटशाखेची चालेल. **मिरजेचा पत्ता** - श्री. शरद गजानन कुलकर्णी, गोरे मंगल कार्यालयासमोर, ब्राह्मणपुरी, गांवभाग, मु. पो. मिरज, जिल्हा - सांगली. **मुलाच्या मावशीचा पुण्यातील फोन नंबर** - सौ. गोसावी ५४६७३४७.

**क्र. १५/२००० वर** सारंग सुधीर भट, कोकणस्थ, जन्म - १२.३.१९७२ गोत्र - काश्यप, १०वी, केन स्टार कंपनी येथे डेमॉनस्ट्रेशन करतो, पगार - २,५००रु. ५'६'' सडपातळ, आई घरगुती व्यवसाय करते. वडील रेल्वेतून निवृत्त, लहान भाऊ खाजगी कंपनीत नोकरी, **अपेक्षा** - घरगुती व्यवसायाची आवड असणारी. **पत्ता** - श्री. सुधीर पुरुषोत्तम भट, बांदल कॉम्प्लेक्स, बिल्डींग नं. ६, फ्लॅट नं. २०, पौंड रोड, पुणे ४११०२९. फोन - ५२८३७४०.

**क्र. १६/२००० वर** धनंजय नारायण कार्लेकर, जन्म - २४.१२.१९७२, गोत्र - वासिष्ठ, कोकणस्थ, १२वी कॉमर्स, पौरोहित्याचा व्यवसाय, पगार - ५०००रु. उंची ५'६'', गहूवर्ण, सडपातळ. **अपेक्षा** - देवाधर्माची आवड व माहिती असणारी. मुलाचे आईवडील त्र्यंबकेश्वर येथे राहतात. २ बहिणी विवाहित. मुलगा पुण्यात असतो. स्वतःचा फ्लॅट आहे. चश्मा आहे. **संपर्कासाठी स्नेही व शेजारी राहणारे श्री. सुधीर भट** यांच्याशी संपर्क साधावा. **पत्ता** - क्र. १५/२०००चाच आहे.

**क्र. १७/२००० वर** मंदार मनोहर केळकर, गोत्र - शांडिल्य. जन्म - २१.१.१९७४, B.E. Electronics, व्होल्टा इंडिया कं. पुणे येथे सिनीयर इंजिनिअर, पगार - १६,०००रु., ५'५'' गोरा, सपोर्ट आईवडील व १ लहान भाऊ, भिलाईला असतात. पुण्यात मुलगा भाड्याचा फ्लॅट घेऊन रहात आहे. **अपेक्षा** - मुलगी उच्चशिक्षित असावी. **संपर्क** - M.G. केळकर, १४ बी, गल्ली नं. २६, सेक्टर १०, भिलाई, मध्यप्रदेश ४९०००६.

**क्र. १८/२००० वर** योगेश हरिभाऊ कुलकर्णी, गोत्र - जामदग्नी, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, जन्म २७.३.१९७३, B.E. (Mech) M.S. (Mech) U.S.A. G.S.S. Ltd. पुणे येथील कंपनीत सिनीयर सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे. पगार - ३०,०००रु., ६'१'', उजळ रंग, सुदृढ, रक्त गट A+ve, आईवडील आहेत. एकुलता एक मुलगा. **अपेक्षा** - B.E. किंवा M.C.M. किंवा कॉम्प्युटरमधील उच्चशिक्षित असावी. **संपर्क** - हरिभाऊ रामचंद्र कुलकर्णी, ६९३ सदाशिव पेठ, माधव स्मृती, कुमठेकर मार्ग, चितळे सदन समोर, पुणे ४११०३०. फोन - ४४५०१४३.

**क्र. १९/२००० वर** मिलिंद प्रभाकर पेंडसे, गोत्र - जामदग्नी, कोब्रा, जन्म - ७.९.१९६८, M.Com., G.DCA, DPM व MPM चालू. मर्सिडीझ बेंझ या जर्मन कंपनीत मॅनेजर. पगार - १६,०००, ५'२'' निमगोरा, रक्त गट B+ve, आईवडील व १ लहान भाऊ नोकरी करतो. **संपर्क** - प्रभाकर गणेश पेंडसे, १४२४ सदाशिव पेठ, काशिनाथ स्मृती अपार्टमेंट, खजिना विहीर रस्ता, पुणे ४११०३०. फोन - ४४७०७६९.

**क्र. २०/२००० वधू** कु. अनुश्री सुनील थिटे. गोत्र - काश्यप, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, जन्म - १८.१२.१९७७, B. E. Production, टेल्कोमधे इंजिनिअर, पगार - १०,०००रु., ५'४'' सडपातळ निमगोरी, **अपेक्षा** - इंजिनिअरींगमधील उच्च शिक्षित, परदेशी राहण्याची तयारी आहे. मुलीला आई वडील, आजी आजोबा, १ लहान बहीण व १ भाऊ आहे. दोघेही शिकत आहेत. **संपर्क** - श्री. सुनिल वसंत थिटे, २४३ सहकार नगर नं. १, पंकज सोसायटी, आसरा बंगला, पुणे ४११००९. फोन - ४२२६७११.

**क्र. २१/२००० वधू** कु. वृंदा गोविंद कुलकर्णी. गोत्र - पाराशर, देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण, जन्म - २२.६.१९७६, ५'३'' गोरीपान, सडपातळ, A+ve, कॉंटॅक्ट लेन्सेस वापरते. B.E. (Eletro & Telecom) Electronica Machine Tools Pvt. Ltd. मधे ट्रेनी इंजिनिअर, ५,०००रु., **अपेक्षा** - इंजिनिअर, C.A. किंवा डॉक्टर चालेल. मुलीला आईवडील, २ विवाहित बहीणी व १ लहान बहीण आहे. **संपर्क** - श्री. गोविंद चिंतामण कुलकर्णी, A ३ १०, चिंतामणीनगर, भाग ३, बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

* * *

## बालादपि वंगभाषितम् ग्राह्यम्

**गजानन भास्कर** (पृ. ४२७), यांनी हितगुज जून १९९४ मधे प्रसिद्ध झालेला त्यांचा 'आजोबा बंगाली शिकतात' हा लेख पु. ल. देशपांडे यांना पाठवला होता. त्यांना 'पु.लं'नी स्वतःच्या हस्ताक्षरात पाठवलेले उत्तर : ''तुम्ही पाठवलेला 'आजोबा बंगाली शिकतात' हा विनोदी लेख वाचला. तुमच्या नातवंडांच्या प्रतिक्रिया वाचून 'बालादपि वंगभाषितम् ग्राह्यम्' असे म्हणावेसे वाटले. लेखाच्या कात्रणाबद्दल धन्यवाद. नातूमंडळींना आशीर्वाद.

कंपवातामुळे लेखन करणे कष्टदायक होते. अक्षर खराब येते. क्षमस्व.''

- **पु. ल. देशपांडे**

हसरे हितगुज

## चीअर्स

'चीअर्स' म्हणून पेय प्यायला सुरवात करण्यापूर्वी सर्वजण ग्लासला ग्लास का लावतात?

सर्वांच्या ग्लासातले पेय सारखेच आहे ना हे पहाण्यासाठी!!

- प्रेषक - **प्रीता संजय करमरकर** (लक्ष्मण शंकर, पृ. ५२० यांची मुलगी श्रुती)



Marathe Pratishthan

# ''गोड - कडू - आंबट - तुरट''

- सौ. शालिनी अच्युत चक्रदेव (पृ. ७३२)

*निवृत्त कारागृह अधिक्षक अच्युत महादेव चक्रदेव ह्यांनी तुरुंगाधिकाऱ्याला तारेवरची कसरत कशी करावी लागते याबाबतचे रोमहर्षक अनुभव सांगितले. पहा हितगुज मार्च २०००, पृ. १३-१४. त्याच्या पत्नीचेहि हे अनुभव तुम्हाला 'कांकण' भर सरसच वाटतील. - संपादक*

माझं माहेर सांगलीच्या पाटणकरांकडचं! वडील सांगलीच्या सुप्रसिध्द श्रीगणपती देवस्थानचे पुजारी. घरातील वातावरण धार्मिक.... एकत्र कुटुंब! घरी कायम २४-२५ कुटुंबीय! मी शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाले. महाविद्यालयीन शिक्षण घ्यायचा विचार नव्हता. शिवणाचा वर्ग घराजवळच होता. त्या वर्गामधूनच शिवणाची पदविका घेतली. १-२ वर्ष अशीच गेली. वर संशोधन सुरू झाले. पुण्यातले चक्रदेवांचे स्थळ आहे. मुलगा कारागृह खात्यात अधिकारी आहे एवढे समजले. यथायोग्य हालचाली वडील मंडळींकडून झाल्या आणि १९६५ साली माझा विवाह श्री. अच्युत महादेव चक्रदेव यांचेशी झाला.

लग्नाचे वेळी हे येरवडा येथे प्रशिक्षणासाठी होते. त्यामुळे त्यांना फक्त ४ दिवस रजा मिळाली. असं कळलं की लग्नाचे आदले दिवशी केळवणास सुध्दा त्यांना येता आलं नाही. मला आश्चर्यच वाटलं.

लग्नानंतर लगेचच ४-५ दिवसांनी बिऱ्हाड थाटण्यासाठी मी सासुबाईंच्या बरोबर येरवड्याला, आम्हाला मिळालेल्या निवास स्थानाकडे चालले होते. तो पर्यंत ह्यांना मी गणवेषात पाहिलेले नव्हते. अचानक बाजूने सायकलवरून हे आले आणि मी चकित झाले, भांबावले. ह्यांचा गणवेष म्हणजे खाकी हाफपँट, खाकी हाफशर्ट, डोक्यावर बेरी कॅप, पट्टा, पायात बूट एवढा होता. मला हा सगळा वेष अधिकाऱ्याचा मुळीच वाटला नाही. एखाद्या शिपायासारखाच वाटला.

क्षणात अनेक विचार डोकावून गेले. अधिकारी म्हणून सांगून शिपायाशीच लग्न लावून दिले की काय? ही तर फसवणूकच झाली. गप्प राहून मी घरी आले. सावकाश जेवण झाल्यावर ह्यांना अधिकाऱ्यांचा वेष असाच असतो का विचारले. तेव्हा हे हसत सुटले आणि त्यांनी खुलासा केला, प्रशिक्षण चालू असताना सर्वजण सारखेच असतात. पदचिन्हे लावायची नसतात. प्रशिक्षण संपल्यावर अधिकारी, शिपाई असे स्तर चालू होतात, तेव्हा माझा जीव भांड्यात पडला व मनावरचे दडपण दूर झाले. हा माझा पहिला दिवस.

प्रशिक्षण संपल्यावर आमची बदली नागपूरला झाली. इतक्या लांब आजपर्यंत मी कधीच गेले नव्हते. एकत्र कुटुंबातली मी, सैरभैर झाले. मनावर प्रचंड दडपण आले. परंतु सुदैवाने ह्यांच्या एका नागपूरच्या मित्राने अर्ज दिला. तो मंजूर झाला व आमची बदली ठाण्याला झाली.

> हसरे हितगुज
>
> **'सरकारी' नोकरी**
>
> सरकार म्हणजे<br>
> नक्की काय कुणास ठाऊक?<br>
> पण काही लोक<br>
> बायकोलाच 'सरकार' म्हणून<br>
> स्वतःला<br>
> या 'सरकारी' नोकरीत<br>
> कायम करून घेतात.
>
> **- प्रकाश धुळे**
>
> ***('शिखर', MSCBK मुखपत्रांतून)***

ठाण्याला रुजू होताच ह्यांना रात्रपाळीची ड्युटी लागली. बंगला मोठ्ठा होता. सोबतीला कोणी नाही, एकटीनीच संपूर्ण रात्र काढायची. हा वेगळाच जीवनक्रम सुरू झाला. मनांतून खूप भीति वाटायची. संडास, बाथरूम पाठीमागच्या बाजूला अंगणात. त्यामुळे रात्री बाहेर जायचे म्हणजे जिवाचा थरकाप व्हायचा. शेवटी निर्णय घेतला आणि मी व्हरांड्यात झोपू लागले. कारण आमच्या निवासासमोर जेलच्या शिपायांच्या क्वार्टर्स होत्या. उन्हाळ्यामुळे सगळे शिपाई घराबाहेर झोपायचे. त्यामुळे मला त्यांची सोबत वाटायची.

पण एकदा गंमतच झाली. अचानक एका रात्री विजा चमकायला लागल्या. ढग गडगडू लागले. सगळे दिवे गेले. सगळे शिपाई गडबडीने आपापल्या घरी गेले. मी पण अंधारातच कशीबशी गादी गोळा करून आपल्या खोलीत डोक्यावर पांघरुण घेऊन झोपायचा प्रयत्न केला. पण झोप कसली लागते? संपूर्ण रात्र मी थरथरतच काढली आणि मनाशी ठरवून टाकले की आता इथे रहायचे नाही. त्याप्रमाणे सकाळी हे घरी आल्यानंतर त्यांना मी मला सांगलीला किंवा पुण्याला पोचवायला सांगितले तेव्हा ते हसतच सुटले.

योगायोगाने आमची बदली येरवड्याला झाली. ठाण्याला असतानाच स्मिताचा म्हणजे, मोठ्या मुलीचा जन्म झाला. येथेही जागा मोठ्ठी होती. संडास, बाथरुम, जिने इ. झाडायला तसेच धुण्याचे व इस्त्रीचे कपडे न्यायला, द्यायला कैदी यायचे. सुरवातीला मनावर खूप ताण पडायचा. कारण असा अनुभव अजिबात नव्हता. कोणी चोर, कोणी दरोडेखोर, कोणी खिसेकापू, कुणी खुनीसुध्दा त्यात असायचे. कुणी गैरफायदा तर घेणार नाही ना? असं वाटत रहायचं. पण असं कधीच घडलं नाही. सर्वजण विश्वासानेच, अदबीने वागत. एवढेच नव्हे तर प्रसंगी मुलांशी गोडी गुलाबीने वागत. याचीही पुढे सवय झाली. मुलांना तर कैद्यांची, वॉर्डरची कधीच भीति वाटली नाही.

इचलकरंजीला बंगल्याच्या मागे मोठी बाग होती. धाकटा प्रसाद सकाळी बागेत कैद्यांशी गप्पा मारण्याकरिता वाट बघत बसलेला असायचा. कारण इचलकरंजीला आमच्या शेजारी कोणीच नव्हते. हे सबंध दिवस जेलमध्ये. आम्ही बोलणार कुणाशी? इचलकरंजीचीच गोष्ट! पुण्याला लग्नाला येण्यासाठी ह्यांची रजा मंजूर झाली होती. त्यानुसार दुसरे जेलर साहेब हजर झाले होते. ते नवीन



Marathe Pratishthan

होते. ह्यांनी सर्व कामाचा ताबा त्यांना दिला आणि दुसऱ्या दिवशी पहाटे आम्ही पुण्याला येणार होतो. रात्री आम्ही झोपलो आणि अचानक जेलमधून शिट्ट्या आणि घंटेचा आवाज जोरात येऊ लागला. नवीन आलेले जेलर साहेब व हे त्वरित उठून जेलमध्ये गेले. जेलमधून एक कैदी पळून गेला होता. त्याची सर्व ठिकाणी शोधाशोध सुरू झाली. यामुळे नवीन जेलर साहेब भांबावून गेले व या घटनेने पुढचे सोपस्कार अनुभवी म्हणून ह्यांनाच करावे लागले. या गडबडीत लग्नाला जायला उशीर झाला व सगळी योजना बारगळली. पुढे तो कैदी त्याच दिवशी संध्याकाळी सापडला. रात्रपाळीच्या शिपायाला शिक्षा झाली. नमूद करण्यासारखे असे बरेच अनुभव की ज्यामुळे आम्ही ठरवलेले बेत, योजना आम्हाला रहित कराव्या लागल्या.

आमच्या सुमारे १४-१५ ठिकाणी बदल्या झाल्या. एका गावी जरा रमलो, स्थिर झालो असे वाटते न वाटते तोच कुठेतरी बदली व्हायची. पुन्हा सर्व सामानांची बांधाबांध, व्यवस्थित पॅकिंग, ट्रकची जोडणी वगैरे होऊन आम्ही नवीन ठिकाणी रूजू व्हायचो. रूजू झाल्यावर पुन्हा नवीन घर, नवीन परिसर, नवीन माणसं, नवीन शाळा, कॉलेज इत्यादि नाविन्य सुरू व्हायचं व थोड्याच अवधीच आम्ही रुळून जायचो. सुदैवाची गोष्ट एवढी की आम्हाला सर्व ठिकाणी चांगले शेजार, चांगली माणसे, चांगल्या जागा, मुलांना चांगल्या मित्र-मैत्रिणी भेटत गेल्या. या सर्वांचे व आमचे आजतागायत स्नेहाचे, प्रेमाचे संबंध आहेत. बदल्या होऊन सुध्दा सर्व मुलांची शिक्षणे यशस्वीरित्या पूर्ण झाली. प्रत्येकजण आपापल्या क्षेत्रामध्ये स्थिरावली आहेत.

कारागृहातील कर्मचाऱ्यांचे काम हे चोवीस तासांचे समजले जाते. रात्री अपरात्री कारागृहामध्ये तपासणी - फेऱ्या माराव्या लागतात. तुरुंगाधिकाऱ्यावरच या प्रमुख जबाबदाऱ्या असतात. तुरुंगाच्या प्रकाराप्रमाणे कैद्यांचा प्रवेश, कामे, जेवण-खाण, मुक्तता, सुरक्षितता इत्यादि गोष्टी प्रामुख्याने बघाव्या लागतात. कारागृहामध्ये एखादी गंभीर घटना घडल्यावर उदा. मारामारी, कैदी पळून जाणे, आग लागणे, अपघात इत्यादि प्रकार अकस्मात घडल्यास जेलमध्ये आलार्म व्हायचा. आलार्म झाला की, कर्मचारी जेवत असो, आंघोळ करत असो, विश्रांती घेत असो त्याला दंडा हातात घेऊन धावत-पळत जेलवर जाऊन समोर झालेल्या प्रसंगाला तोंड द्यावे लागे. अर्थातच आमच्या घरी पण एकदम निराळेच वातावरण होत असे. आणि हा ताण हे घरी येईपर्यंत असायचा. पुष्कळ वेळेला ५-६ तास सुध्दा वाट पहायला लागयची व काही कळायचे पण नाही व घरातून बाहेर पण पडायला यायचे नाही.

शेगाव, बुलढाणा जिल्ह्यातलंच गांव. बुलढाण्याला ह्यांची बदली झाली होती. मी १ महिनाभरच बुलढाण्याला गेले होते. शेगांवला जाऊन गजानन महाराजांचे दर्शन घेण्याची खूप इच्छा होती. परंतु ह्यांना क्वार्टर सोडायला परवानगी नसे. शेवटी डीआयजी ची ४ तासाकरिता परवानगी काढून आम्ही शेगांवला जाऊन आलो.

त्यातल्यात्यात सुखद अनुभव म्हणजे आम्ही १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, क्रीडा महोत्सवाच्या कार्यक्रमासाठी सर्व बायका मुले ग्राऊंडवर जमत असू. झेंडावंदन झाल्यावर मुलांचे निरनिराळे खेळ, आमची बायकांची संगीत खुर्ची, रांगोळी स्पर्धा असायची. नंतर बक्षीस समारंभ असायचा, खूप मजा यायची.

जेलमध्ये ह्यांनी कैद्यांची बरीच नाटके बसवून घेतली होती. तालमीसाठी ह्यांना रात्रीच जावं लागायचं. त्यातली काही नाटके सबंध स्टाफला जेलच्या बरॅकमध्येही दाखविण्यात आली होती हा एक अनुभव निराळाच होता.

येरवडा जेलला असताना माझ्या जावेची मंगळागौरीची पूजा आमच्याकडे केली होती. बऱ्याच नातेवाईक बायका माझ्याकडे आल्या होत्या. त्यावेळी जक्कल, सुतार, जगताप इत्यादि जेलमध्येच होते. सहज मी बायकांना बोलून गेले आता सगळ्यांना कोर्टात नेतात. जक्कल, सुतारला पहाण्याची सगळ्यांनाच उत्सुकता होती. त्यामुळे सगळ्यांनी एकदम जेलकडेच धाव घेतली आणि आश्चर्य म्हणजे सर्व बायकांना जक्कल सुतार जगताप पहायला मिळाले. त्यांना फाशी दिली तोही दिवस मला आठवतो. अतिशय कडेकोट बंदोबस्त आणि पूर्ण गंभीर वातावरण आमच्या परिसरांत होते.

हे जरी कारागृहाच्या सेवेतून निवृत्त झाले असले तरी कैद्यांच्या पुनर्वसनासाठी स्थापन झालेल्या 'नवजीवन मंडळ' या संस्थेत संपर्क अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे अजून काही किस्से ऐकायला, अनुभवायला मिळतात. ***


# एस्. पी. सर्व्हीसेस

- डेकोरेल तसेच सर्व प्रकारचे पडदे.
- 'सोबीत' लॅच लॉक्स्.
- टि.व्ही., वॉशिंग मशीन, रिमोट, प्लास्टीक कव्हर्स.
- नेटलॉन, ॲल्युमिनीयम स्लायडींग विंडोज, ग्रील्स् इ. सर्व प्रकारची कामे करतो.

**एस्. एस्. मराठे**

F-6, किर्ती नगर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी,
वडगांव (बुद्रूक), पुणे ४११ ०४१. ☎ : ४३५ १२ ८४


**Be A Winner**

**Smt Swati Abhyankar** (daughter of Vijay Anant, Page 155), Pune

The winner is always
 A part of the answer
The loser is always
 A part of the problem.
The winner always
 Has the answer
The loser always
 Has the excuse
The winner says
 It is difficult but not impossible
The loser says
 It is possible but very difficult.

Marathe Pratishthan

# एका शिक्षिकेच्या हृद्य आठवणी

- **सौ. सुमती माधव विद्वांस** (पृ. ६२६) मुलुंड मुंबई.

***युवक-युवतींना शिक्षकी पेशा त्याज्य वाटतो. तरुणांनी विसरू नये की टिळक-आगरकर, पु.ल. देशपांडे, राष्ट्रपती राधाकृष्णन इ. थोर व्यक्ती साधे शिक्षकच होते. समाजाला त्यागी, होतकरू, निस्वार्थी शिक्षकांची गरजच आहे. हुशार युवकांनी ही सुध्दा वाट अवश्य चोखाळावी. त्यात कमीपणा मानण्याची गरज नाही.***

एका पाठ्यपुस्तकात श्री व्यंकटेश माडगूळकर लिखित 'झेल्या' नावाच्या मुलाचे व्यक्तिचित्र होते. अति खोडकर, उनाड मुलगा सुध्दा शिक्षकाच्या प्रेमाच्या प्रभावाने बदलतो, शिक्षकाला चटका लावून जातो, निरोप देताना व्याकूळ बनतो. असे प्रसंग अनेकांच्या वाट्याला येतात. त्या आठवणी पुनःप्रत्ययाचा आनंद देतात.

असे मानसिक परिवर्तन घडविणारे शिक्षक आज दुर्मिळ आहेत. प्राथमिक शिक्षणक्षेत्रात त्यागी, मोफत कार्य करणारे शिक्षक हवेत, असे प्रा. राम जोशी म्हणाले होते.

मी एक प्राथमिक शिक्षिका. प्रथम खेड्यात रुजू झाले. चैत्र महिन्यात शाळेत पाटीपूजनाची प्रथा असे. सुटीचा दिवस. मी घरीच होते. आमचे हेडमास्तर स्थानिक असल्यामुळे, ते हजर होते. दुसऱ्या दिवशी मी शाळेत हजर झाले. प्रार्थना, होऊन अभ्यासखत्र सुरू झाले. एकेका पालकाने ''बाई, तुमचा मान आनला हाय्.'' म्हणून जवळ-जवळ १/२ शेर तांदूळ, नारळ, दक्षिणा, पेढा असा नजराणा बहाल केला. पहिलाच प्रसंग! मी संकोचले. हेडमास्तर म्हणाले ''बाई, ही त्यांची श्रध्दा. त्याला तडा जाऊ देऊ नका.''

खेड्यात गाव-पंचायत चालते. हे आम्ही पुस्तकात शिकलो. मी ज्या गावी शिकवीत होते त्या गावी पंचायत भरे. अचानक एका विद्यार्थ्याचे आई-वडील देवाघरी गेले. दोन भाऊ, एक छोटी बहीण, मागे राहिले. यांचा सांभाळ कोण करणार? हीच मला काळजी. एका साक्षर पालकाला त्याबद्दल विचारले. ''आमची पंचायत, सगेसोयरे'' सहजपणे तो म्हणाला. आणि खरोखरच त्यांचा संभाळ केला. तो मुलगा कमवू लागला. मुले अनाथ म्हणून रस्त्यावर आली नाहीत. ही कर्तव्यनिष्ठा लोप पावत चालली आहे.

कालांतराने मी मुंबई महापालिकेत रुजू झाले. कल्याण-कुर्ला रोज गाडीचा प्रवास. दुपार अधिवेशन. संध्याकाळी कसारा, गर्दीच्या गाडीचा प्रवास. आमचं टोळकं जिवाच्या कराराने गाडीत घुसे. गर्दीतून वाट काढत आम्ही एका जागी स्थिरावलो. गप्पा रंगल्या. एक मुलगी खिडकीजवळ बसली होती. मला सारखी खुणावत होती. माझा प्रतिसाद नाही. त्या मुलीने मात्र चिकाटी सोडली नाही. शेवटी काही मैत्रिणी म्हणाल्या, ''अग ए मेहेंदळे, बघ की ती छोकरी काय म्हणतेय'' वाट काढत मी तिच्याजवळ पोचले. मला तिने चक्क खिडकीजवळची जागा दिली. गालात हसत हसत म्हणाली ''बाई मी मराठे!'' गंमत आहे नं! ती आडनावाची मराठेच निघाली. पोलिस लाईनीत रहाणारी. कर्तव्यबुद्धीने कुटुंबाला मदत देणारी शिष्या, मला विसरली नाही. मन आनंदातिशयाने भारावले. पेशाचे सार्थक झाल्याचे समाधान मिळाले.

अशीच ८-१० वर्षापूर्वी मी अक्कलकोटला गेले होते. चुलत भावाकडे आठवडाभर पाहुणचार झाला. वहिनी म्हणाली ''चला बाजारात जाऊया'' देवळे बाजार हिंडत असता वहिनी म्हणाली ''वन्स! बांगड्या भरून घ्या.'' माहेरवाशिणीला बांगड्यांचा आग्रह. नाही कसे म्हणणार? दुकानात शिरलो. छान वर्खाच्या बांगड्या भरल्या. अचानक नव्या नवरीने मला नमस्कार केला. ''मला फक्त सवा रुपया द्या.'' वहिनी म्हणाली, ''का ग?'' ''या माझ्या तिसरीच्या बाई. वाडिया शाळेतल्या.'' अक्षरशः मी २-३ महिनेच त्या शाळेत होते. अशा आठवणीने मनाला आनंदाचे भरते आल्याशिवाय कसे राहील?

माझ्या सदतीस वर्षाच्या शालेय सेवेत, फारशा बदल्या झाल्या नाहीत. पालिकेच्या आदर्श मानल्या जाणाऱ्या शाळेतून मला संधी मिळाली. शेवटची १४ वर्षे मी शाळेच्या स्थापनेपासून निवृत्तीपर्यंत एकाच शाळेत होते. अनेक विद्यार्थी हाताखालून गेलेले. शाळेत संस्कृतिक स्पर्धा असत. नव्या दमाच्या शिक्षकांनी छानसा कार्यक्रम बसविला. पार दूरदर्शन गाजवून आला. मैदानावर परिपाठाचा तास होत असे. पालकवर्ग कौतुकाने मुलांचे काम न्याहाळत. एक शिक्षिका बक्षीसपात्र मुलांची ओळख करून देत होत्या. आपली ओळख संपल्यावर सर्वांसमोर तो मुलगा चक्क माझ्या पाया पडला. सारे वातावरण आश्चर्याने भारावले. मी त्याला थोपटले. त्याची भावना ओळखली. उपमुख्यांनी त्याला विचारले. ''त्याच बाईच्या पाया का पडलास?'' मुलाने सांगितले, ''बक्षिसाची सुरवात इथूनच'' पहिली ते तिसरी त्याने कथाकथनात बक्षिस मिळवले होते. पुढे तो वक्तृत्वातही चमकला.

शालेय जीवनात शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे सोने करणारे, उपजतच कला अंगी असणारे छोटे कलावंत, खेळाडू, हुशार, नम्र आणि शिक्षकांबद्दल नितांत आदर असणारे कितीतरी विद्यार्थी मी पाहिले आहेत. त्यांच्या घडणीत कुठेतरी माझे अस्तित्व टिकून आहे याचा मला अभिमान वाटतो. ✳✳✳

## 'सार्वजनिक गणेशोत्सव'
## कसा असावा? कसा नसावा?

लोकमान्य टिळकांची सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करण्यामागची प्रेरणा आणि आजचे त्याचे स्वरूप याबाबत वाचकांनी आपले विचार पुढील अंकात प्रसिध्दीसाठी पाठवावे.

- **संपादक**



Marathe Pratishthan

# आरोग्यासाठी आत्मविश्वास

- **यशवंत लक्ष्मण** (प. १०१), विंग कमांडर (निवृत्त), पुणे

***मला ६९वे वर्ष चालू आहे. या वयापर्यंत येताना काही अडथळे पार करावे लागतात. मागच्याला ठेच लागू नये म्हणून या शर्यतेतील काही अनुभव.***

दोन वेळा मला असे आजार झाले की त्यातून जगण्याची आशा कमी असं डॉक्टरांचं मत होतं.

वयाच्या ४८व्या वर्षी अल्सर फुटून शरीरातलं जवळ जवळ सर्व रक्त वाहून गेले. मेंदूला रक्त अपुरे पडेल असे वाटल्यामुळे अहमदाबादहून स्पेशल हेलीकॉप्टरने मला पुण्याच्या मिलटरी हॉस्पिटल मध्ये हलविण्यात आले. पेशंट मृत अवस्थेत पोहोचेल अशी भीति व्यक्त करण्यात आली. निराशेचे विचार माझ्या मनात आले नाही व ऑपरेशन नंतर दोन आठवड्यात मी बरा झालो.

तीन वर्षापूर्वी म्हणजे वयाच्या ६६व्या वर्षी मी मुंबईला गेलो असताना अस्वस्थ वाटून रात्रभर झोप आली नाही. दुसऱ्या रात्रीही तसेच झाल्यावर मध्यरात्री डॉक्टरना बोलावले. त्यांनी बी.पी. २६६ आहे व दुसरा हार्ट अटॅक चालू आहे आणि ताबडतोब हॉस्पिटलला नेणे जरूरीचे आहे असे सांगितले. मी हिंदुजा हॉस्पिटल मध्ये एक महिना होतो. याही वेळी स्वतःबद्दल मला कधी भीति वाटली नाही.

या दोन प्रसंगातून मी सही सलामत राहिलो यात वैद्यकीय शास्त्रातील प्रगती व माझा आत्मविश्वास याचा सारखाच वाटा आहे.

३ वर्षापूर्वी पहिल्यानेच दाताचे फिलिंग करायचा प्रसंग आला. ४ दाढा ताबडतोब काढण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. फिलिंग १-२ महिन्यानंतर निष्फळ होईल असे त्यांनी सांगितले. पण मी फिलिंग आग्रहाने करून घेतले. अजून त्या दाढा मजबूत आहेत. डॉक्टर आपले काम करतात. पण त्यांच्या प्रयत्नांना यश येण्यासाठी आपण बरेच काही करू शकतो.

वयाच्या ६९व्या वर्षी मी ३ तास कष्टाची व ५-६ तास बैठी पण मानसिक ताण देणारी कामे करतो. ऊस दातानी सोलू शकतो. मला स्वानुभवाने काय शिकता आले, हे मी सांगू इच्छितो.

१) **नियमित व्यायाम** - यात योग्य पद्धतीने श्वास घेणे सर्वात महत्त्वाचे आहे. श्वास आत घेताना पोटापासून वर घ्यायचा आणि सोडताना वरून पोटाच्या खळगी पर्यंत. हे २४ तास आपोआप व्हायला हवे, म्हणजे सर्व पेशींना पुरेसा प्राणवायू मिळतो. रोज सकाळी अर्धा तास श्वासाची गती सव्वापट वाढेल असा व्यायाम केला पाहिजे. जलद चालणं हे सर्वोत्कृष्ट!

२) **आहार** - सात्विक म्हणजे शक्यतो कमी मीठ, साखर व तल असलेला. कोलेस्टेरॉल कमी करायला कच्चा दुधी भोपळा खाणे फायदेशीर आहे. दोन तीन वेळा जोरात लघवी होईल एवढे पाणी प्यायला हवं. हळदीच्या गुळण्या दातांची मुळं निकोप राखतात.

३) **आशावादी विचार** व त्यायोगे मनोबल वाढवलं पाहिजे शवासन करताना मनाला सतत चांगल्या सूचना दिल्या तर शारीरिक व मानसिक स्वास्थ मिळविण्यास मदत होते.

रात्री बिछान्यावर पडल्या पडल्या झोप लागणे व सकाळी ठरल्या वेळेला जाग येणे व त्यानंतर न रेंगाळता सतत काम करायला उत्साह वाटणे हीच चांगल्या आरोग्याची पावती आहे.

***

# प्रवाशांना सावधगिरीच्या सूचना

- **विठ्ठल महादेव** (पृ. २३५) सांगली

***दिवाळी व नाताळच्या सुटीत अनेक लोक प्रवासाला जातात. प्रवासात काय काळजी घ्यावी याबाबतच्या या सूचना अगदी साध्या वाटतात. पण त्या निश्चितच मोलाच्या आहेत. - संपादक***

१) प्रवासात विशेषतः रेल्वेगाडी पकडण्याचे वेळी अगर एखाद्या मोठ्या शहरात एकमेकांची चुकामूक झाल्यास मोठी अडचण व काळजीचा प्रश्न निर्माण होतो; व पुढील प्रवास कसा करावा याचाही प्रश्न पडतो. यासाठी अशी परिस्थिती उद्भवल्यास सर्वांनी एके ठिकाणी संपर्क साधावयाचे ठरवून ठेवलेले असावे. शक्यतो आपल्या घरच्या फोन नंबरवर आपला ठावठिकाणा कळवावा म्हणजे एकमेकांचा पत्ता लागेल.

२) प्रवासात बहुतेकजण आपला घरचा पत्ता जवळ ठेवतात. पण आपण ज्या गावात उतरलो आहोत तेथील पत्ताही जवळ ठेवावा. हॉटेलमधे उतरलो असू तर हॉटेलचे कार्ड मागून घ्यावे. लहान मुलांजवळही पत्ता लिहिलेला कागद ठेवावा.

३) प्रसाद म्हणून दिला असला तरी असा चिमूटभर सुद्धा पदार्थ तिऱ्हाईत माणसाकडून घेऊ नये, घेतला तर खाऊ नये.

४) प्रवासात गेलेल्या आपल्या घरच्या लोकांबद्दल बाहेरून फोन आल्यास फोन करणाऱ्याकडून त्याचा फोन नंबर विचारून परत त्या ठिकाणी फोन करून खात्री करून घ्यावी म्हणजे फसवणूक होणार नाही.

***

# बंगाली आजोबांचा 'व्हॅलेन्टाईन डे'

- **गजानन भास्कर** (पृ. ४२७), घाटकोपर, मुंबई

माझा, टी.व्ही. सिरियल महाश्वेतामधील राधेसारख्या लांबसडक केस असणाऱ्या तरुणीशी परिचय झाला. ती एक शेपटा पुढे घेऊन व एक मागे ठेवून, गोड बोलायची. या लकबीमुळेच मी तिच्यावर फिदा झालो. फडके - खांडेकरांच्या नायिका शेपट्याशी चाळा करत प्रियकराशी गुलुगुलु बोलायच्या, त्याचा मनावर पगडा होता.

'व्हॅलेन्टाईन डे' च्या दिवशी मी पहाटेच दादरच्या फुलबाजारातून दोन टप्पोरे गुलाब घेऊन येताना, ती दुधाच्या बाटल्या आणताना दुरूनच दिसली. मला धक्काच बसला. कारण तिचे केस तोकडे होते. म्हणजे ती टोपाची किमया होती.

माझा व्हॅलेन्टाईन डे असा फसला. मात्र ही गोष्ट आहे चाळीस वर्षापूर्वीची. तेव्हा 'लालू'च्या शब्दात 'बाल कटी औरतें' नव्हत्या.

***(महाराष्ट्र टाईम्स मुंबई १४.२.२००० मधून साभार)***

Marathe Pratishthan

## या अंकात


१. **गुन्हेगार आणि राजकारण्यांची अभद्र युती** ..................... पृ.१
राष्ट्रपती के. आर. नारायणन

२. **चारोळ्या** .............................................. पृ.४
कु. सायली सतीश

३. **घर** .............................................. पृ.५
विनायक केशव

४. **Philosophy of life** .............................. पृ.७
नीलांबरी रमेश

५. **झोपाळ्यावरचे रामायण** .............................. पृ.८
कै. डॉ. व्यंकटेश धोंडदेव

६. **मन** .............................................. पृ.८
सौ. विद्या सुनील चक्रदेव

७. **एक आगळी श्रध्दांजली - दोन प्रतिक्रिया** .............. पृ.९
(१) डॉ. पांडुरंग रामचंद्र आणि (२) वसंत रावजी

८. **बालादपि वंगभाषितम् ग्राह्यम** .......................... पृ.११
पु. ल. देशपांडे

९. **गोड - कडू - आंबट - तुरट** .......................... पृ.१२
सौ. शालिनी अच्युत चक्रदेव

१०. **Be a winner** .............................................. पृ.१३
Smt. Swati Abhyankar

११. **एका शिक्षिकेच्या हृद्य आठवणी** .......................... पृ.१४
सौ. सुमति माधव विद्वांस

१२. **आरोग्यासाठी आत्मविश्वास** .......................... पृ.१५
यशवंत लक्ष्मण

१३. **प्रवाशांना सावधगिरीच्या सूचना** ...................... पृ.१५
विठ्ठल महादेव

१४. **बंगाली आजोबांचा 'व्हॅलेन्टाईन डे'** .................. पृ.१५
गजानन भास्कर

याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.३), **खुषीपत्रे** (पृ.७,१०), **विवाह सहाय्य** (पृ.१०)आणि **हसरे हितगुज** (पृ.११,१२) ही नेहमीची सदरे.


**बुक पोस्ट**

**प्रति**


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(दू. नं. ४३०२४५३)


Marathe Pratishthan